दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -२४ | मंगळवार, दि.३० सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-24 | Tuesday, Dt.30 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ४८ मंडळांत अतिवृष्टी; पुरातून १२ जणांना वाचवले

## ६ तालुक्यांत अतिवृष्टीची नोंद, ५ महसूल मंडळांत १०० मिमीहून अधिक पाऊस



बीड / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पावसाचा कहर सुरुच असून २४ तासांत जिल्ह्यात ६४.२ मिमी पाऊस झाला. शनिवारी दिवसभर ते रविवारी पहाटेपर्यंत एकूण ६ तालुक्यांत अतिवृष्टीची नोंद झाल, तर ८ तालुक्यांतील ४८ महसूल मंडळातही अतिवृष्टी झाली. ५ महसूल मंडळांत १०० मिमीहून अधिक पाऊस झाला आहे. पाऊस, पुराने आधीच जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले असताना पाऊस सुरुच असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्याची बिकट स्थिती होत असल्याचे पाहून रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हीसीद्वारे बीडच्या परिस्थितीचा आढावा घेतला. सततच्या अतिवृष्टीने पिके वाहून गेली, नदीकाठच्या शेतकऱ्यांची जमीन खरडून गेली. पूरामुळे १० जणांचे बळी गेले. शेकडो पशूंचा मृत्यू झाला असून घरांची पडझड झाली आहे. जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शनिवारी दिवसभर व रविवारी पहाटेपर्यंत जिल्ह्यात तब्बल ४८ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. पावसामुळे वडवणी तालुक्यातील तिगाव ते रसाळ वस्ती, गांडगे वस्ती ते राम नाईक तांडा रस्ता व त्यावरील पूल वाहून गेला आहे.

गेवराई, माजलगाव । जायकवाडी धरणातून २ लाख २६ हजार क्युसेकने होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे गोदावरी नदीला पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे गेवराई तालुक्यातील ३२ व माजलगाव तालुक्यातील गोदाकाठच्या गावातील नागरिकांची झोप उडाली आहे. २००६ मध्ये पूरस्थितीने झालेले हाल आता पुन्हा होतील अशी धास्ती या नागरिकांना आहे. नदीकाठच्या अनेक कुटुंबाचे स्थलांतर रविवारी दुपारी करण्यात आले. संसार सोडून जाताना नागरिकांच्या डोळ्यांत पाणी आले होते. सर्वत्र पाणी होते. बीड शहरातील धांडेनगर भागात पावसामुळे पाणी शिरले होते. दोन वेळा मोठ्या प्रमाणावर या परिसरात पाणी शिरल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. रविवारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या परिसरात पाहणी केली. नागरिकांशी चर्चा केली व प्रशासनाला सूचना दिल्या. जिल्ह्यात बीड तालुक्यातील १३, पाटोदा तालुक्यातील ४, आष्टी तालुक्यातील १०, गेवराई तालुक्यातील ८, केज तालुक्यातील ४, धारुर तालुक्यातील १, वडवणी तालुक्यातील २, शिरुर कासार तालुक्यातील ६ महसुली मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. आष्टीच्या चार महसूल मंडळात १०० मिमी पेक्षा जास्त पाऊस आहे तर केजच्या एका मंडळाचा समावेश आहे. दौलावडगाव मंडळात (१२९.०), धानोरा मंडळात (११३.८), पिंपळा मंडळात (१०२.०), दादेगाव मंडळात (११३.८), केज तालुक्यातील हनुमत मंडळात (१०३.८) अशा ५ महसूल मंडळांचा समावेश आहे. बीड । जिल्ह्यात काही दिवसांपासून सतत अतिवृष्टी सुरू आहे. सर्वत्र महापूर आला आहे. नदी-नाल्यांचे पाणी शेतात घुसून पिके पाण्याखाली बुडाली. काही ठिकाणी शेतीच खरडून गेली. पिकांत जास्त काळ पाणी राहिल्याने पिके सडून गेली . परिणामी, शेतकरीवर्ग पूर्णपणे कोलमडला आहे.

# लातूरच्या तीन गावात भूगर्भातून मोठा आवाज अन् जमीन हलल्याचा भास

राज्यातील बहुतांश भागात सध्या पडत असलेल्या पावसाने एकच धुमाकूळ घालत जनजीवन पूर्णतः विस्कळीत केलं आहे. या मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला असून यात बळीराजा पुरता हवालदिल झाला आहे. कायम दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्यात अतिवृष्टीने सर्वत्र दाणादाण उडवली असल्याचे चित्र आहे. तर एकीकडे पावसामुळे निसर्गाची अवकृपा झाली असताना याच मराठवाड्यातील निलंगा तालुक्यातील कलांडी खडकउमरंगा आणि डांगेवाडी या गावात एक विचित्र घटना घडली आहे. यात २९ सप्टेंबर रोजी अवघ्या दोन तासांत भूगर्भातून पाच वेळा भयानक आवाज झाल्याने धरणी हलल्याचा अनुभव नागरिकांना आलाय. तर अचानक झालेल्या या घटनेमुळे नागरिकांनी घराबाहेर पळ काढत पावसात रस्त्यावर आश्रय घेतलाय.



## बुलडाण्यातील १९८ शेतक-यांचा सामूहिक जलसमाधीचा इशारा

### न्याय द्या अन्यथा जलसमाधी अधिका-यांना दिले निवेदन

बुलडाणा : जिल्ह्यातील शेतक-यांवर गेल्या काही महिन्यांपासून सतत संकट कोसळत आहे. नोव्हेंबर २०२३ व २६ फेब्रुवारी २०२४ या काळात सिंदखेड राजा व देऊळगाव राजा तालुक्यात गारपीट व अवकाळी पावसामुळे शेकडो शेतक-यांचा आतोनात नुकसान झाले होते. शासनाच्या आदेशात मदत देण्यासंबंधी प्रत्येक गावाचा समावेशही जाहीर झाला. मात्र, आजतागायत शेतक-यांच्या हाती एक रुपयाची देखील मदत पोहोचलेली नाही. यामुळे येथील शेतकरी आक्रमक झाले आहेत.

सततच्या आस्मानी आणि सुलतानी संकटाला कंटाळून १९८ शेतक-यांनी जलसमाधी घेणार असल्याचे निवेदन दिले आहे. शेतक-यांवर स्पष्ट अन्याय होत आहे. याशिवाय गेल्या दोन महिन्यापासून सुरु असलेली अतिवृष्टी ढगफुटी मुसळधार पावसामुळे खरीप पिकाचही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शिवाय शेतकरी कर्जबाजारी झाला असून त्याला शासकीय मदत मिळतच नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर आहे. अशा या गंभीर परिस्थितीवर शासनाने तोडगा काढावा अन्यथा शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने १९८ शेतकरी ९ ऑक्टोबर रोजी पळसखेड चक्का येथील खडकपूर्णा नदीत जलसमाधी घेतील. अशा प्रकारचे निवेदन आज सिंदखेड राजा उपविभागीय अधिका-यांना १९८ शेतक-यांनी वैयक्तिकरित्या दिल आहे. त्यामुळे आता प्रशासनासमोर मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

# गावात पाणीच पाणी, वह्या-पुस्तकेही भिजली



बीड / प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या मराठवाड्याच्या भागात सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान तर झालेच आहे, त्यात घरांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वह्या-पुस्तके देखील या पूरात वाहून गेली आहेत. त्यात उद्या १२ वी बोर्डाच्या परीक्षेचा फॉर्म भरायचा शेवटचा दिवस आहे. सर्वत्रच पाणीच पाणी असल्याने फॉर्म भरायला जायचे तरी कसे? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे.बीड जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या एका गावातील बारावीची विद्यार्थिनी स्नेहल तांबेने चिंता व्यक्त केली आहे. उद्या बारावी बोर्ड परीक्षांचा फॉर्म भरायचा शेवटचा दिवस असून गावात सगळीकडे पाणी शिरल्याने घरतील सर्व पुस्तके, नोट्स आणि अभ्यासाचे साहित्य भिजून गेले आहे. गावाला पाण्याचा वेढा आहे, आता फॉर्म भरायला कसे पोहोचावे? असा प्रश्न स्नेहलला पडला आहे.

वह्या-पुस्तकांना पैसे कुठून आणायचे?

अशा परिस्थितीत शासनाने फॉर्म भरण्यास मुदत वाढ न दिल्यास आमचे वर्ष वाया जाईल, अशी भीती देखील स्नेहल तांबेने व्यक्त केली आहे. स्नेहलने आपली व्यथा मांडाताना सांगितले की, अचानक आलेल्या पाण्यामुळे वर्षभर अभ्यास करून काढलेल्या नोट्स वह्या-पुस्तके सर्व पाण्यात जाऊन खुजली आहेत. आता चार-चार वेळा सामान हलवताना छोटी छोटी कोंबड्यांची पिले मेली. सारखे जड समान हलवून पोटात दुखत आहे. आता परीक्षेचा फॉर्म भरायची वेगळीच काळजी लागली आहे. फॉर्म भरायला जायला किमान ४० किलोमीटर वळसा घालून कोणाच्यातरी मदतीने पोहोचावे लागेल. शेतातले सगळे वाहून गेल्याने आता दप्तर, वह्या-पुस्तकांना पैसे कुठून आणायचे, असा सवालही तिने उपस्थित केला आहे.

तर दुसरीकडे, धुळे तालुक्याच्या आर्वी येथील जिल्हा परिषद अंतर्गत सोनुबाई शंकर शेंणगे परिवार हायस्कूलमध्ये बारावीच्या परीक्षेच्या फॉर्म भरण्यावरून गोंधळ झाला असल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी शाळेतील कर्मचाऱ्याला मारहाण देखील करण्यात आल्याचे दिसून आले आहे.

# एसटी आरक्षण लॉक, चावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडेच- अजिंक्य चांदणे





बीड (प्रतिनिधी):

अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील आरक्षणाच्या मुद्यावरून सुरू असलेल्या वादाला प्रतिसाद देताना अजिंक्य चांदणे यांनी कठोर भूमिका व्यक्त केली. बीड येथे आदिवासी समाजाच्या उलगुलान महामोर्चा प्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, एसटी प्रवर्गाचे आरक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घट्ट लॉक करून ठेवले आहे. या प्रवर्गात कोणीही मनमानी पद्धतीने प्रवेश करू शकत नाही किंवा बाहेर पडू शकत नाही. या लॉकची चावी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडेच आहे. त्यामुळे ज्यांना आरक्षण हवे आहे त्यांनी चावी त्यांच्याकडूनच घ्यावी, आमच्यावर दडपण आणू नये.

चांदणे पुढे म्हणाले की, हे आरक्षण फडणवीसांचे किंवा हेडगेवारांचे देणे नाही. हे आरक्षण आमच्या पूर्वज छत्रपती शाहू महाराज, फुले-आंबेडकरांच्या संघर्षाचे फळ आहे. तुमच्या पूर्वजांनी आम्हाला गावकूस आणि जंगलाच्या सीमेपलीकडे ढकलले होते, पण शाहू-फुले-आंबेडकरांनीच आम्हाला शिक्षण, हक्क आणि आरक्षण दिले.

आरक्षणावरून सध्या निर्माण झालेल्या बंजारा-धनगर समाजाच्या असंतोषाबद्दल बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, बंजारा आणि धनगर समाज आमचेच आप्तेष्ट आहेत. त्यांनी आरक्षणासाठी हट्ट धरू नये. पण आंब्याने आंबा पाडायचा, भाऊभाऊमध्ये भांडण लावायचे हे धोरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राबवत आहेत. हे आपण ओळखले पाहिजे.मोर्चात सहभागी झालेल्या हजारो कार्यकर्त्यांनीही या वेळी आरक्षण आमचा हक्क आहे, कुणाच्या बापाचे नाही अशा घोषणा देत आपली भूमिका ठामपणे मांडली.

चांदणे यांनी भाषणाच्या शेवटी आदिवासी समाजाला एकत्रित राहण्याचे आवाहन केले आणि आरक्षणाचे रक्षण हेच आजच्या काळाचे महत्त्वाचे कार्य आहे, असे सांगून केंद्र व राज्य सरकारच्या भूमिकेवर तीव्र टीका केली.

# एसी-एसटी आरक्षणा वरुन राजकीय डावपेच -दिपक केदार





बीड /प्रतिनिधी

अनुसूचित जाती (एसी) व अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाचे आरक्षण हे संविधानिक हक्क असून त्यावर कोणीही डोळा ठेवू नये, असे स्पष्ट मत दिपक केदार यांनी व्यक्त केले. बीड शहरात आदिवासी समाजाच्या उलगुलान महामोर्चा दरम्यान बोलताना त्यांनी आरक्षणासंदर्भातील सध्याच्या राजकीय हालचालींवर सरकार आणि विरोधक दोघांनाही लक्ष्य केले.

केदार म्हणाले, आमचं भांडण एसी आणि एसटी कडे वाकड्या नजरेने बघणाऱ्यांशी आहे. कारण एसी आणि एसटी प्रवर्गाचं आरक्षण हे मूळ आहे, हे आरक्षण थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेब जिवंत असताना संविधानातून मिळालेलं आहे. त्यामुळे हे कुणाचं उधार, दान किंवा कृपेने मिळालेलं नाही.

त्यांनी पुढे सरकारवर थेट हल्ला चढवला. फडणवीस काय राजकारण करत आहेत, सरकार काय डावपेच रचत आहे हे जनतेच्या नजरेतून सुटलेलं नाही. प्रत्येक वेळी बंजारा, वंजारी, धनगर समाजाला गाजर दाखवायचं, आश्वासनं द्यायची आणि त्यावरून समाजात गोंधळ निर्माण करायचा, हे सगळं लोकांना समजलं आहे. लोक आता मूर्ख राहिलेले नाहीत. राजकारणी आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी आरक्षणाचा विषय पेटवतात.

केदार यांनी मोर्चातून समाजाला एकतेचा संदेश देत सांगितले की, एसी-एसटी समाजाचे आरक्षण धोक्यात येऊ नये यासाठी आपण सर्वांनी एकत्र उभं राहायला हवं. आजचं आव्हान फक्त सरकारविरोधात नाही तर समाजातील फूट पाडण्याच्या कटांविरोधातही आहे.

# राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मभूमीत होणार पंकजा मुंडेंचा दसरा मेळावा

वंचितांचा शोषितांचा मेळावा म्हणून पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्याची ओळख आहे.या मेळाव्याचे हे ११ वे वर्ष असून राष्ट्रसंत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर हा मेळावा दरवर्षी होत असतो.यंदाचा दसरा मेळावा २ ऑक्टोबर रोजी असणार आहे.या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडेंचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी जिल्ह्यातूनच नाही तर राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त - मुंडे समर्थक लाखो समर्थक भगवान भक्ती गडावर दाखल होत असतात.संत भगवान बाबाच्या जन्मभूमी असल्या कारणाने सावरगाव घाट येथे होणाऱ्या या मेळाव्याला महत्व आहे.



# डॉ.विनोद रविन्द्र वाकडे बी ए एम एस परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीण

जाफराबाद : हरी भालके

जाफराबाद शहरातील मालेगाव गल्लीमधील शेतकरी कुटुंबातील रवींद्र सखाराम पाटील वाकडे यांचे चिरंजीव डॉ.विनोद रविंद्र वाकडे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथील डॉ. जे जे मगदुम आयुर्वेदिक मेडिकल महाविद्यालयातून बी ए एम एस च्या शेवटच्या वर्षा मध्ये ७१ टक्के गुण मिळवून बी ए एम एस ही पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे.महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाला संलग्नित वैद्यकीय महाविद्यालय द्वारे ४.५ वर्षात हा अभ्यासक्रम पूर्ण केला जातो.

डॉ.विनोद वाकडे यांनी अतिशय मेहनत घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न उराशी बाळगून आपला प्रवास केला आहे.



या यशाबद्दल डॉ.विनोद वाकडे यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे त्यामध्ये जाफराबाद नगरीच्या नगराध्यक्षा सौ.कविता दिपक पाटील वाकडे,नगरसेवक दिपक पाटील वाकडे,नगरसेवक रविराज जैस्वाल,न्यू हायस्कूल मुख्याध्यापक रमेश मुरकुटे,जिल्हा परिषद चे मुख्याध्यापक उमेश दुनगहु,सुरेश पाटील वाकडे,नंदकिशोर पाटील वाकडे,भीमराव पाटील वाकडे,

विष्णु पाटील वाकडे, मुकुंदा पाटील वाकडे,

राजु पाटील वाकडे,फारुक कुरेशी, हारेस पठाण,शेख कौसर,संदीप पाटील वाकडे,अँड.शरद पाटील वाकडे,रविंद्र कोल्हे,समाधान सरोदे पाटील,विनोद काकडे,डॉ.मंगेश पवार,डॉ. पुजा मंगेश पवार वाकडे,गजानन गव्हाड,संजय छडीदार, अंकुश पाटील वाकडे,माधव पाटील उबाळे,प्रदीप बोबडे,विशाल वाकडे

तसेच समस्त मालेगाव गल्ली,शिवगर्जना युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# मराठवाड्यातील पूर ग्रस्तांसाठी मदतीचे आवाहन,केजकरांकडून पुन्हा मदतकार्याची चळवळ सुरु

केज/प्रतिनिधी

सध्या मराठवाडा परिसरात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून शेकडो कुटुंबे विस्थापित झाली आहेत घरगुती साहित्य, अन्नधान्य व आवश्यक वस्तूंचा मोठ्या प्रमाणा वर तुटवडा जाणवत आहे.या पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील सामाजिक संघटना, प्रतिष्ठित नागरिक व तरुण मंडळींनी मदत कार्याची हाक दिली आहे.२०१९ च्या कोकण महापुरावेळी केज तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कोकणातील पूरग्रस्तांना मदत केली होती.त्याच पद्धतीने आता आपल्या घरच्याच केजकरांना, मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांना मदत करण्यासाठी सर्व स्तरां तून प्रतिसाद मिळत आहे.मदत सामग्रीत ब्लँकेट,चादरी,अन्नधान्य,तेल,बिस्किटे,चूरमुरे, फरसाण,भडंग, शेंगदाणा चटणी,दूध पावडर,वाळलेले खाद्य पदार्थ,औषधे,गृह उपयोगी साहित्य व सॅनिटरी पॅड्स अशा आवश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.ही मदत गोळा करून पूरग्रस्तांना पोहोंचवण्याचे नियोजन युद्धपातळीवर सुरू आहे.या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या दानशूर बांधवांना,वरील नमूद वस्तू स्वरूपात मदत देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.नागरिकांनी आपल्या क्षमतेनुसार मदत करून पूरग्रस्त कुटुंबांच्या संकटात हातभार लावावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# उमरी टोल नाका बंद करण्याच्या मागणीवर शिवसेना उबाठा पक्ष ठाम, घडामोडीला आला वेग

केज/प्रतिनिधी

मौजे उमरी ता.केज येथील टोल नाक्यामुळे स्थानिक जनतेला होत असलेल्या त्रासा विरोधात शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने तीव्र भूमिका घेण्यात आली आहे.तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली असून,तातडीने टोल अधिकार्यांची बैठक घेण्याचे नियोजन सुरू केले आहे.स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार,उमरी टोल नाका चुकीच्या पद्धतीने सुरू करण्यात आला आहे.रस्त्याचे काम अद्याप पूर्ण न होता चढउतार करून टोल वसुलीची घाई करण्यात आल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेत.शिवाय परीसरा तील वाहनांना कोणतीही सूट न देता थेट टोल आकारला जात असल्याने परिसरातील नागरिकां मध्ये संतापाची लाट उसळली आहे.याच पार्श्वभूमीवर दि.२९ सप्टेंबर रोजी शिवसेना तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वा खाली केज तहसील समोर रस्ता रोको करण्याच्या इशाऱ्यासह निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनाची केज तहसीलदार राकेश गिड्डे यांनी गांभीर्याने दखल घेत तात्काळ टोल अधिकार्यांची बैठक बोलावून समस्ये वर तोडगा काढण्याचे नियोजन सुरू केले आहे.प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने शिवसेनेने प्रस्तावित रस्ता रोको आंदोलन तात्पुरते दहा दिवसांसाठी स्थगित करण्याचा निर्णयघेतला आहे.मात्र टोल नाका बंद करण्याचा निर्णय लवकर घेतला गेला नाही तर दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र रस्ता रोको व आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.या घडामोडींमुळे उमरी टोल नाक्यावरील परिस्थितीवर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मागण्या व प्रशासनाचा पुढील निर्णय यावरच पुढील घडामोडी ठरणार आहेत.




# महाविद्यालयीन जीवनातच स्वत:ची ओळख निर्माण करा– ऍड. रुक्मीण बागल

माजलगाव (प्रतिनिधी) महाविद्यालयीन जीवनातच स्वतःची ओळख निर्माण करायला हवी असे प्रतिपादन विधीज्ञ ऍड. रुक्मीण बागल यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समिती यांच्या वतीने नवरात्र निमित्त महाविद्यालयात दिवस तुझे हे फुलायचे या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.अध्यक्षस्थानी स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रज्ञा जोशी या तर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. प्रेमनंदा घडसिंग, सखी सावित्री मंचच्या प्रमुख प्रा. सुवर्णा पांचाळ उपस्थित होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजच्या काळात शिक्षण व करिअरवर आपण जास्त लक्ष देण्याची गरज आहे आजचा जमाना हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए. आय.) चा आहे. ज्ञान हे आपल्या दारामध्ये येऊन उभा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मग त्याचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग करायचा हे आपणच ठरवले पाहिजे. या काळामध्ये आपण योग्य ती खबरदारी व निर्णय घेतले तर भविष्यात आपण नक्कीच यश संपादन करू. अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रज्ञा जोशी म्हणाल्या की, नवरात्र उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय असा सण आहे. या काळामध्ये नऊ दिवस देवीचे उपवास करून लोक देवीची मनोहर भावे प्रार्थना करतात. ज्यामधून आपणास आपली मानसिक व शारीरिक स्थिती संतुलित राखण्याचे काम केले जाते. नवरात्र उत्सव हा नऊ दिवसच का साजरा केला जातो याचे महत्त्व देखील त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितले. प्रास्ताविक प्रा.सुवर्णा पांचाळ यांनी केले. सूत्रसंचालन काठूळे ऋतुजा बालासाहेब हिने केले तर आभार प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. स्वाती साखरे, प्रा. प्रीती कळसणे, प्रा. मंदा मस्के, प्रा.पूजा सिंग, प्रा. पूजा मस्के, सौ. स्वाती धर्माधिकारी, आशा कांबळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## अखंड हरिनाम सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा – भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री





आष्टी (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) तसेच ब्रह्मलीन संतश्री महंत शंकरपुरी मंगळपुरी महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी वैराग्यमूर्ती श्री सुदर्शन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. हा सोहळा दि. ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. कार्यक्रमाची सांगता महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने होणार आहे.

दैनंदिन धार्मिक उपक्रम – पहाटे काकडा भजन, सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ज्ञानसत्र, संध्याकाळी हरिपाठ तर रात्री हरिकिर्तन व संगीत भजन अशा विविध कार्यक्रमांनी परिसरातील वातावरण हरिभक्तिमय होणार आहे. प्रवचन व कीर्तनकार – ह. भ. प. उमेश महाराज दशरथे (आळंदी), ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगाव), ह. भ. प. रामराव महाराज ढोक (नागपूर), ह. भ. प. उल्हास महाराज सूर्यवंशी (आळंदी), ह. भ. प. जयवंत महाराज बोधले (पंढरपूर), ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), न्यायाचार्य महंत नामदेव महाराज (भगवानगड) यांसह अनेक संत प्रवचन व कीर्तनातून अध्यात्मिक मार्गदर्शन करणार आहेत.


संगीत भजनाचे वैशिष्ट्य – संगीतकार पंडित कल्याणजी गायकवाड, भजनसम्राट संगीतविशारद इंद्रमान गुरुजी, संगीत अलंकार सदानंद गुरुजी मगर, इंडियन आयडॉल राहुलजी खरे, संगीत अलंकार झूका गुरुजी यांसह पंचक्रोशीतील नामवंत गायक व मृदंगाचार्य आपली कला सादर करणार आहेत.

महंत स्थापना सोहळा – बुधवार दि. ८ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांचा २१ वे महंत स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त ग्रामस्थ सांगवी (पाटण) व पंचक्रोशीतील संतसेवक मंडळींनी केले असून परिसरातील भाविक व वारकरी संप्रदाय यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# सोन्याचे अंडी देणारा कारखानाच वाहून गेला सिंदफनेच्या महापुरात !

मानूर प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील दहिवंडी हद्दीत कर्ज घेऊन उभारलेला कुक्कुटपालन व्यवसाय म्हणजेच सोन्याची अंडे देणारा कारखाना सिंदफना नदिला आलेल्या महापुरात कोंबडी पक्षासह वाहून गेला असल्याने पुर्ण कुटूंब हतबल झाले .दहिवंडी शिवारात हनुमंत सुपेकर यांनी सात वर्षापुर्वी एच डी एफ सी बँकेकडून चार कर्ज व भारतीय स्टेट बँकेकडून दोन लाख घेऊन कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला होता ,रोजीरोटीचा प्रश्न चांगला मार्गी लागला होता ,त्यातून काही कर्ज फेडले मात्र तरिही ११२००० बाकी आहे .



पांच माणसाचे हे छोटे कुटूंब जेमतेम मजेत संसारात रमले होते मात्र महापुराने बसलेली घडी पुर्णतः विस्कटली पुन्हा हा डोलारा कसा उभा करायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

तलाठी ,ग्रामसेवक , पशुवैद्यकीय अधिकारी यांनी स्थळ पंचनामा केला .श्रुती सुपेकर ही मुलगी पाचवीत तर शौर्य हा दुसरीत शिक्षण घेत आहेत ,आता त्यांच्या शिक्षणावर देखील प्रश्नचिन्ह उभा राहिले असल्याचे सुपेकर यांनी सांगितले .रात्री पुर आला काही कळायच्या आत आम्ही बाहेर पडलो खरे मात्र घर संसार आणि उद्योग हे डोळ्यादेखत वाहून जातांना मनाला वेदना होत होत्या .सुखी संसाराला महापुराने तडा गेला आता शासन काय आणि किती मदत करणार यावरच भविष्य अवलंबुन असल्याचे सांगितले .

# प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन करणाऱ्या हर्षद झानपुरेचा समाज बांधवांकडून भव्य सत्कार

## आमदार सुरेश धस यांनीही दूरध्वनीवरून दिल्या शुभेच्छा



पाटोदा : प्रतिनिधी

शहरातील एका पेट्रोल पंपावर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या सुहास झानपुरे यांचा मुलगा हर्षद झानपुरे याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत चिकाटी, जिद्द आणि अभ्यासाच्या जोरावर एमबीबीएसच्या शासकीय वैद्यकीय शिक्षणासाठी पात्रता मिळवून दाखवली आहे. गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्याची निवड झाली असून पाटोद्यातील हर्षद लवकरच एमबीबीएस डॉक्टर होणार आहे.या अभूतपूर्व यशानंतर रविवार, पाटोदा शहरातील नगरेश्वर परिसरात ब्राह्मण महासंघ व सर्व समाज बांधवांच्या वतीने हर्षदचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी समाज बांधवांनी एकत्र येऊन हर्षदच्या यशाचा मोठ्या जल्लोषात गौरव केला तसेच यावेळी आमदार सुरेश धस यांनी देखील दूरध्वनी भरून हर्षद ला शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रशांत देशमुख, किशोर देशमुख, गणेश पांडव, श्रीकांत धसे, देशपांडे, ड. सुधीर एकबोटे, रवींद्र धसे, राहुल देशमुख, ड. महेश बेदरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी हर्षदचे कौतुक करताना सांगितले की, जिद्द, मेहनत आणि चिकाटी असेल तर कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवता येते, हर्षद याचे उदाहरण सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

या सत्कार कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे समाजातील युवक-युवतींचा मोठा सहभाग होता. हर्षदच्या यशाने प्रेरित होऊन अनेक तरुणांनी त्याच्याशी संवाद साधला. त्याने आपला संघर्षमय प्रवास आणि अभ्यासातील सातत्य सांगितले. स्वप्न कितीही मोठं असो, त्यासाठी मेहनत आणि विश्वास असेल तर ते नक्कीच पूर्ण होते, असे प्रेरणादायी विचार हर्षदने यावेळी मांडले.पत्रकार एड. महेश बेदरे यांनी कार्यक्रमावेळी आमदार सुरेश धस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी आमदार धस यांनी हर्षदशी थेट संवाद साधून त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.हर्षदने प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले हे यश पाटोदा शहर आणि आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. पुढील शिक्षणात किंवा आयुष्यात कोणतीही अडचण आली, तर मी सदैव तुमच्या पाठीशी उभा राहीन.

– आ. सुरेश धस

# गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी सर्व शिक्षकांनी एकजुटीने प्रयत्न करावेत - आ. सुरेश धस

## स्वामी विवेकानंद पतसंस्थेची ५१ वी सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

आष्टी – (प्रतिनिधी) स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्या. कडा, ता. आष्टी, जि. बीड ची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी अंबिका लॉन्स शेरी बु., ता. आष्टी, जि. बीड येथे अत्यंत खेळीमेळीत संपन्न झाली. सुरुवातीला प्रथम सत्र संपन्न झाले.

प्रथम सत्राच्या अध्यक्षस्थानी आ. सुरेश आण्णा धस हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. भीमराव धोंडे, शिक्षण तज्ञ पुणे डॉ. दत्तात्रय तापकीर, मा. शिक्षण सभापती उद्धव बापू दरेकर, पं. स. मा. सभापती बद्रीनाथ जगताप, मंडल अध्यक्ष अनिल ढोबळे, शिक्षणाधिकारी लातूर नागनाथ शिंदे, आष्टी पं. स. गटशिक्षणाधिकारी श्रीम. सीमा काळे, प्रा. निर्मलाताई तापकीर, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, विनोद ढोबळे, संजय गाढवे, कडा बाजार समिती सभापती रमजान तांबोळी, संदिप खाकाळ आदि मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तद्नंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे यांनी प्रास्तविक करतांना सांगितले की, संस्थेच्या सर्व संचालक मंडळ व सभासदांच्या कार्यतत्परतेमुळे या संस्थेने ५१ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत सुवर्णमहोत्सवी वर्षात भव्य वटवृक्षाप्रमाणे प्रगती साधली आहे. फक्त कर्जसुविधाच नव्हे तर विमा संरक्षण, बचत प्रोत्साहन, संगणकीकृत पारदर्शक कामकाज, मोबाईल प, चेकलेस बँकिंग, क्यूआर कोड सुविधा अशा आधुनिक सेवा संस्थेने सभासदांना उपलब्ध करून दिल्या आहेत. आज संस्थेची सभासद संख्या ९९० असून भागभांडवल रु. २८ कोटींपेक्षा जास्त आहे, तर ठेवींचा आकडा रु. ५८ कोटींपर्यंत पोहोचला आहे. सभासद कल्याण निधीतून मयत सभासदांच्या वारसांना तीस लाख रुपयांची मदत करण्यात आलेली आहे. संस्था शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतही अग्रणी असून मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान, स्वच्छ शाळा – सुंदर शाळा, गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान, आदर्श शिक्षक पुरस्कार अशा उपक्रमांद्वारे शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे मा. आ. भीमराव धोंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षकांच्या पतसंस्थेत तोटा होण्याचे कारणच नसते. शिक्षक हे व्यावहारिक असतात. त्यांचे आर्थिक नियोजन चांगले असते. स्वामी विवेकानंद पतसंस्थेने सामाजिक जाणीव म्हणून पुरग्रस्तांसाठी आर्थिक हातभार लावावा. आता सर्वत्र सिबीएससी पॅटर्न लागू झालेला आहे. त्याचाही अभ्यास करणे काळाची गरज आहे. मुलांनी जेवढ्या भाषा शिकू तेवढे चांगले आहे. तसेच राज्य सरकारने विद्यार्थी संख्येची अट शिथील करावी. शेवटी शिक्षकांनी एक दिवसाचा पगार पुरग्रस्तांसाठी द्यावा अशी विनंती करुन पतसंस्थेच्या सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते आदर्श शिक्षकांचा सन्मान, सेवानिवृत्त शिक्षक सभासदांचा सन्मान, उपक्रमशील शाळांचा सन्मान, मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा सन्मान, मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियानांतर्गत सवोत्कृष्ट शाळा सन्मान, गुणवंत शिक्षक सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शिक्षण तज्ञ डॉ. दत्तात्रय तापकीर यांनी शिक्षण व सद्यस्थिती यावर भाष्य करुन जीवन हे समाजाभिमूक असावे तसेच नवीन शैक्षणिक धोरणा नुसार इतर कौशल्यावर शाळेत शिकवतांना भर देण्यात यावा असेही शेवटी बोलतांना सांगितले.




यानिमित्ताने शेवटी अध्यक्षिय मनोगत व्यक्त करतांना आ. सुरेश आण्णा धस म्हणाले की, गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी सर्व शिक्षकांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, शिक्षक हा समाजाचा आरसा असल्याने त्यांचे योगदान भविष्यातील पिढी घडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे अशी भावना व्यक्त केली. फक्त कर्ज सुविधाच नव्हे तर विमा संरक्षण, बचत प्रोत्साहन, संगणकीकृत पारदर्शक कामकाज, मोबाईल प, चेकलेस बँकिंग, क्यूआर कोड सुविधा अशा आधुनिक सेवा संस्थेने सभासदांना उपलब्ध करून दिल्या बद्दल संस्थेच्या सर्व संचालक मंडळाचे व सभासदांचे अभिनंदन केले.

यावेळी आ. सुरेश आण्णा धस यांनी पुरग्रस्तांसाठी तालुक्यातील शिक्षकांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत जवळ जवळ चारशे सभासदांचे ५ लाख रुपये जमा होत आहेत. त्याचाही चेक पतसंस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांनी आ. सुरेश धस यांच्याकडे सुपूर्द केला. वार्षिक सर्वसाधारण सभेचे बहारदार सुत्रसंचलन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी तर आभार संचालक नितीन करडुळे यांनी मानले. तद्नंतर संस्थेच्या वतीने सुरुची भोजन देण्यात आले.

दुपारी द्वितीय सत्रात मागील सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सचिव महेशकुमार शिंदे यांनी केले. नंतर विषयपत्रिकेनुसार कामकाज सुरु होवून अनेक विषया बाबत सभागृहात हसत खेळत सविस्तर चर्चा होवून १ नोव्हेंबर २०२५ पासून तातडी कर्ज मर्यादा ५० हजारावरुन १ लाख रुपये करण्याचा निर्णय सर्वानुमते झाला. याप्रसंगी अनेक गुणवंत व होतकरु सभासदांनी चर्चेत सहभाग नोंदविला. अशाप्रकारे स्वामी विवेकानंद पतसंस्थेची ५१ वी सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न झाली.

सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, संचालक आप्पासाहेब काळे, चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहेरकर, आजिनाथ गर्जे, पोपट बोराडे, नितीन करडुळे, रत्नाकर चव्हाण, स्वानंद थोरवे, हिरामण पोकळे, विठ्ठल शिंदे, संजय काळे, गोरक्ष गोरे, श्रीम. शैला सातपुते – पोकळे, श्रीम. मनिषा होळकर – उढाणे, कार्यतत्पर व्यवस्थापक ज्योतीराम देसाई, संगणक तज्ञ वैजनाथ रायते, सेवक ज्ञानदेव जाधव यांनी कठोर परिश्रम घेतले. यावेळी सभेस सभासद बंधू – भगिनीं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.सुरेश धस यांच्या सुचनेवरुन विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थीचे अनुदानातून रक्कम कपात करु नका

## पिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे खाते थांबवु नका तहसिलदार वैशाली पाटील यांचा सर्व शाखाधिक-यांना आदेश

आष्टी - (प्रतिनिधी) आ. सुरेश धस यांचे सुचनेवरून आष्टी तालुक्यातील एसबीआय, एमजीबी, सीबीआय, इंडिया बँक या शाखा व्यवस्थापकांना विशेष सहाय्य योजनेंतर्गतयो राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दपकाळ, विधवा, दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी, नमो शेतकरी सन्मान निधी ह्या लोककल्याणकारी योजना असून शेतकरी, वृध्द, दिव्यांग, अनाथ, विधवा, निराधार इ. व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण करण्याकरिता राबविण्यात येत आहेत. यंदा आष्टी तालुक्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक संकटाने (पूरग्रस्त) हतबल होऊन, आर्थिकदृष्ट्या

खचलेला आहे. त्यात थकीत पिक कर्जामुळे आपण बचत खाते थांबविलेले आहे. पर्यायी शेतकऱ्यांचे सर्व व्यवहार बंद होऊन अधिकच संकटात सापडलेला आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांचे खाते न थांबविता पूर्ववत सुरु करावे. जेणेकरून विविध योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या खात्यावर जमा होणारी रक्कम त्यांना वापरता येऊन त्यांना आर्थिक उभारी मिळणे शक्य होईल, सध्यस्थितीत शेतकऱ्यांचे बँकेतील बचत खाते थांबून ठेऊ नयेत.

कोणत्याही कारणास्तव लाभार्थीचे बँक, पोस्ट खात्यात जमा झालेल्या अनुदानातून रक्कम कपात केली जात असलेबाबत



या कार्यालयाकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. शेतकरी, वृध्द, दिव्यांग, अनाथ, विधवा, निराधार लाभार्थींच्या खात्यावर जमा होणारे अनुदान त्यांचे खात्यातून कोणत्याही प्रकारे रक्कम कपात करण्यात येऊ नयेत असे तहसीलदार वैशाली पाटील



## तहसीलदारांचे आवाहन अन व्यापारीमहासंघाचा प्रतिसाद,हातावर पोट असणाऱ्या मजुरांसाठी दिला पंचावन्न हजार रुपयांचा मदत निधी

केज/प्रतिनिधी

अतिवृष्टी झाली अन हातावर पोटअसणाऱ्या स्थलांतरित मजुरांचे हाल सुरु झाले हाताला काम नाही मग पोट भरणार कसे अशावेळी नशिबी फक्त उपासमार सुरु झाली त्यांची ही अवस्था तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या कानावर आली अन त्यांनी केलेल्या मदती च्या आवाहनाला केज व्यापारी महासंघाने तात्काळ प्रतिसाद देत अवघ्या अर्धा तासात पंचावन्न हजारांची मदत तातडीने तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे सुपूर्द केली.केज तालुक्यात मागच्या पंधरा दिवसापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेच आहे पिके पाण्यात गेली अन होत्याचे नव्हते झाले मात्र या अतिवृष्टीचे आणखीनही बरेच साईड इफेक्ट असून ते आता दिवसेंदिवस समोर येऊ लागले आहेत सोयाबीन काढणीचे दिवस असल्याने तालुक्यात सोयाबीन काढणीसाठी स्थलांतरित मजुरांच्या अनेक टोळ्या मागच्या काही दिवसापूर्वी दाखल झाल्या पण सततच्या पावसामुळे काम तर सोडा त्यांच्या राहण्याचेही वांदे सुरु झाले आतापर्यंत सोबत असलेले धान्य खाऊन पोटाची खळगी भरली पण पुढे कामच नाही मग पोट भरायच कसे ? हा प्रश्न मागच्या तीन चार दिवसांपासून सुरु झाला पण इथ आपल कुणी नाही मग अडचण सांगायची कुणाला हा ही प्रश्न होताच त्यांची ही अडचण केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे काहींनी सांगितली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत तहसीलदारांनी केज तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांच्या कडे सदरील बाब सांगितली व काही मदत करता येईल का असा प्रश्न केला सूर्यवंशी यांनी वेळ वाया न घालवता तात्काळ व्यापारी महासंघाच्या व्हाट्सअप ग्रुपवर मदतीची पोस्ट केली अन बघता बघता अर्धा तासातच पंचावन्न हजार दोनशे रुपयांची रक्कम जमली. जमलेली रक्कम घेऊन व्यापारी बांधव यांनी तहसील कार्यालयात जात तहसीलदार गिड्डे यांची भेट घेऊन त्यांच्या कडे जमा झालेली रक्कम सुपूर्द केली त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापारी बांधवानी निधी जमवून दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## केज शहरातील कन्हैय्या इव्हेंट्सच्या दांडिया महोत्सवात थिरकला महिला वर्ग,महीलांसह युवतीनी ही लुटला आनंद

केज/प्रतिनिधी

नवरात्र उत्सवामध्ये नारी शक्तीला खुप विशेष महत्व असते. म्हणून मोठ्या शहरा मध्ये जसे महिलांसाठी दांडीयाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात तसाच दांडिया महोत्सव केज सारख्या छोट्या शहरात महिलां साठी घेण्याचे स्वप्न होते ते या दांडिया महोत्सवाचे आयोजन करून पूर्ण केले व केज शहरातील महिलांना कन्हैय्या इव्हेंटसच्या माध्यमातून एक मुक्त सांस्कृतिक व्यासपीठ आम्ही उपलब्ध करून देवू शकलो याचा मनस्वी आनंद होत आहे असे कन्हैय्या इव्हेंटस्चे संचालक रोहन वेदपाठक यांनी सांगितले.कन्हैय्या इव्हेंटस्च्या



माध्यमातून दि.२६,२७,२८ सप्टेंबर २०२५ रोजी उत्सव फंक्शन हॉल,कानडी रोड केज या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या महोत्सवा मध्ये केज शहरातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेवून आनंद घेतला.तीन दिवसीय दांडिया महोत्सवात विविध उपक्रम,आकर्षकविद्यूत रोषणाई,दर्जेदार साऊंड सिस्टीम,सेल्फी पॉईंट महिलांसाठी करण्यात आले होते.समारोप प्रसंगी सहभागी सर्व महिलांना व युवतींना सन्मानचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी सर्वांनी आनंद लुटत

## आ. सुरेश धस यांच्या हस्ते श्रृंगेरी देवीच्या सातव्या माळेला आरती

आष्टी - (प्रतिनिधी) नवरात्री हा देवी उपासनेचा पवित्र उत्सव म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर आणि श्रद्धा, सत्त्व व संस्कारांचा संगम आहे. या पावन परंपरेला सन्मान देत आमदार सुरेश धस यांनी ब्रम्हगाव येथील श्रृंगेरी देवीच्या सातव्या माळेच्या निमित्ताने उपस्थित राहून देवीची मनोभावे आरती केली. या प्रसंगी आमदार सुरेश धस यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधत सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. देवस्थान ट्रस्टतर्फे आमदार धस यांचा सन्मान करण्यात आला.

नवरात्रीच्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यास यावेळी सरपंच रोहिदास पवार, भाऊसाहेब निंबाळकर, ट्रस्ट अध्यक्ष फौजी विजय हराळ, पुजारी मारुती सानप, भाऊसाहेब पवार, उपसरपंच



सचिन हराळ, डॉ.संदीप सानप, शिवाजी सानप, संजय हराळ, सतीष पवार, मारुती बबन पवार, मुकेश आगलावे, नवनाथ नवसुपे, राहुल जमदाडे, साहेबराव वायकर, कल्याण निंबाळकर, गौरव निंबाळकर, बाळू गवारे, बाबू गवारे,अंबादास पवार, संभाजी हराळ यांच्यासह भाविक भक्तमंडळी, ग्रामस्थ तसेच महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिकांचे पाहणी दौरे बंद करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा – राहुल जाधव

पाटोदा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यासह पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पिके अक्षरशः नेस्तनाबूत झाली आहेत. गेल्या काही दिवसांपासून आमदार, खासदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पाहणी दौरे सुरू आहेत. मात्र, कोरड्या आश्वासनापलीकडे अद्याप शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही.

यामुळे हे पाहणी दौरे थांबवून तालुक्यासह जिल्ह्यात तातडीने 'ओला दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शासनाकडे केली आहे.

यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकवेळा ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. बहुतांश शेतकऱ्यांची पिके वाहून गेली असून शेती खरडून गेली आहे. उरलेली पिकेही



पावसामुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर शासनाने पाहणी पंचनाम्यांमध्ये वेळ न घालवता शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिधद्धारे केली.

तसेच मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ घोषित करून पिक विमा कंपन्यांना तातडीने विमा रक्कम वितरित करण्याचे निर्देश द्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## ७९ वर्षांपासून मेंगडेवाडीतील ग्रामस्थ रस्त्याच्या प्रतिक्षेत!

तलावाच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास; अनेकवेळा मागणी करूनही लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष - डॉ. गणेश ढवळे

पाटोदा :- देशाला स्वातंत्र्य मिळून नुकतेच ७९ वर्षे पूर्ण झाली. मात्र अजूनही ग्रामीण भागातील अनेक गावे मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मेंगडेवाडी गावाला आजतागायत डांबरी रस्ता मिळालेला नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांना दररोज हाल सहन करावे लागत आहेत.

ग्रामस्थांनी वारंवार लोकप्रतिनिधींपासून मंत्र्यांपर्यंत किमान रस्त्याची तरी सोय करावी अशी मागणी केली. यासाठी त्यांनी जलसमाधी आंदोलन, रास्ता रोको आंदोलन देखील केले. परंतु केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले गेले.




त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट असून ते आता मोठ्या आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास

मेंगडेवाडी ते वाघिरा या रस्त्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. रस्ता नसल्याने एस.टी. बससेवा येथे पोहोचत नाही. पावसाळ्यात गावकऱ्यांना दूध-दुभते विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. पालक दररोज आपल्या लेकरांच्या जीवावर उदार होऊन शाळेत पाठवतात.

ग्रामस्थांचा आवाज

रस्त्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी विष्णु बांगर, मल्हारी आरगुडे, रामेश्वर शिंदे, छत्रभुज रांजवण, राजेभाऊ कदम, जगन्नाथ बोबडे, कृष्णा जगदाळे, श्रीहरी आरगुडे, दिलीप जाधव, यश बांगर आदी ग्रामस्थांनी केली आहे.

लवकरच रास्ता रोको आंदोलन

अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गापासून फक्त ७ किमी अंतरावर असूनही रस्त्याच्या अभावामुळे ९०० लोकसंख्या असलेल्या गावाला दरवर्षी संकटांना सामोरे जावे लागते. १ ते ४ वीपर्यंत शाळा गावात आहे, मात्र पुढील शिक्षणासाठी वाघिरा, लिंबागणेश, भायाळा येथे जाण्यासाठी रस्ताच नाही. त्यामुळे पालक व विद्यार्थी अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत.लवकरच राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला.

## महिला सशक्तिकरण हीच काळाची गरज – सौ. पूजा ताई कुलकर्णी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वेगाने बदलणाऱ्या आधुनिक युगात महिला अबला नसून सबला झाली पाहिजे. प्रत्येक स्त्री ही देवीचे रूप आहे आणि स्त्रीशक्ती हेच सशक्तीकरणाचे ऊर्जा स्तोत्र आहे. खोलेश्वर परिवाराने माझा सन्मान केला हे माझं भाग्य समजते, असे उद्गार योगेश्वरी देवल कमिटीच्या कोषाध्यक्षा व समाजसेविका सौ. पूजा ताई कुलकर्णी यांनी काढले.

शतकाचे तेज व अमृताची ऊर्जा रुपी शारदा उत्सव निमित्ताने खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड यांनी भूषविले. मंचावर उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ. रवींद्र कुंबेफळकर, उपप्राचार्य आनंद पाठक तसेच प्रा. अनिता बर्दापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी पूजाताई कुलकर्णी यांचा महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना पूजाताई म्हणाल्या



की, खोलेश्वर महाविद्यालयात आयोजित होणारे उपक्रम हे संस्कार घडविणारे आहेत. या परिवाराचा भाग झाल्याचा मला खूप आनंद आहे. महाविद्यालय नेहमीच चांगले आणि उपयुक्त उपक्रम घेते, त्याचे मी मनापासून कौतुक करते.कार्यक्रमात गृह विज्ञान विभाग आयोजित आईस्क्रीम मेकिंग सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत झालेल्या स्पर्धेतील पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. फड यांनी महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती देताना महिला आज सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात मोठी प्रगती करत असल्याचे सांगितले. तसेच योगेश्वरी विश्वस्त मंडळाच्या कोषाध्यक्षा म्हणून निवड झाल्याबद्दल पूजाताईंचे अभिनंदनही केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तृप्ती पडेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मृणाल गोरे यांनी केले तर आभारप्रदर्शन आशालता कलमे यांनी मानले.

## माजी आ.भीमराव धोंडे यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे १ लाख ११ हजार १११ रुपयांचा धनादेश सुपूर्द

### संवेदनशील मनाच्या धोंडेंना संकटग्रस्त बळीराजांचे आशीर्वाद

आष्टी - (प्रतिनिधी) गेल्या आठवड्यापासून अचानक उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजुरांचे जीवन पूर्णतः संपुष्टात आले आहे. अत्यंत भयावह परिस्थितीमध्ये सापडलेल्या बळीराजाला प्रशासन मदत करेलच, तत्पूर्वी माजी आमदार असलेल्या आणि संवेदनशील लोकप्रतिनिधी म्हणून समजल्या जाणाऱ्या आष्टी, पाटोदा, शिरूर का. चे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वतीने (दि. २९) थेट बीड जिल्ह्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन १ लाख ११ हजार १११ रुपयांचा धनादेश सुपूर्द करून माणुसकीचा एक पैलू यानिमित्ताने कर्तव्य करत निभावला आहे.

दरम्यान, ही बाब सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांच्या लक्षात येताच



लोकप्रतिनिधी असावा तर असा अशा भावना सर्वसामान्य ग्रामीण भागातील शेतकरी बांधवातून व्यक्त केल्या जात आहेत. बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडे १ लाख ११ हजार १११ रु. चा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीसाठी देताना माजी आ. भीमराव धोंडे, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाये, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे, पत्रकार हमीद पठाण, माजी सरपंच भागवत वारे, माजी सरपंच प्रफुल्ल सानप आदि मान्यवर उपस्थित होते.

सर्वजण मिळून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढू आपण केलेली ही मदत फार मोठे कार्य नसून माझे ते कर्तव्य आहे असे मी समजतो. शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आजी - माजी आमदार, खासदार यांच्यासह ज्यांच्याकडे उपलब्धता आहे अशा सर्व घटकांनी जमेल तशी आर्थिक मदत करून ग्रामीण भागातील बांधवांना आपण या संकटातून बाहेर काढू, अशा कर्तव्यशील भावना माजी आ. भीमराव धोंडे यांनी हा धनादेश सुपूर्द केल्यानंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.



वडवणी /प्रतिनिधि: एलटीआय व दिलासा यांच्या संयुक्त विद्यमाने १४ गावात जनावरांचे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात शेकडो शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांची तपासणी करून घेतली.शिबिरामध्ये तज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी यांनी जनावरांची तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले. दूध देणाऱ्या जनावरांच्या आरोग्यविषयक समस्या, पोषण व्यवस्थापन, रोगप्रतिबंधक लसीकरण याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.संस्थेच्या वतीने सांगण्यात आले की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व आरोग्य सेवा पोहोचविणे हा उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे. या शिबिरामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एलटीआय व दिलासा संस्थेतील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## वडवणीत मयत राहुल पतंगेच्या कुटुंबास शासकीय आर्थिक मदत व शासकीय सेवेत सामावून घेण्यासंदर्भात निवेदन सादर

वडवणी /प्रतिनिधी

बीड येथील भावसार समाजाचे स्वर्गीय श्री राहुल ज्ञानेश्वर पतंगे यांनी महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याचा अध्यादेश काढल्यामुळे यापुढे ओबीसी चे आरक्षण संपले या नैराश्यपोठी तशी आत्महत्या पुर्वी चिट्ठी लिहून आत्महत्या केली. या आत्महत्यामुळे सदरील कुटुंब उघड्यावर पडले असून मयत राहुल पतंगेच्या पाश्चात पत्नी, दोन हुशार मुलं असुन कुटुंब चा आधारवड गेल्यामुळे कुटुंबासमोर मोठे संकट उभे राहिले असून मयत राहुल पतंगेच्या कुटुंबास शासनाने त्वरित शासकीय मदत जाहीर करावी, या मागणीसाठी ऑल इंडिया भावसार क्षत्रिय महासभा, महाराष्ट्र राज्याच्या आदेशानुसार आज वडवणी भावसार समाजाच्या वतीने मा .तहसीलदार वडवणी यांना निवेदन देण्यात आले .याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र सरकारने नुकतेच हैदराबाद गॅझेट लागू करत मराठा समाजाचा ओबीसी मध्ये आरक्षण देण्यासंदर्भात जीआर काढला असून यामुळे ओबीसी समाजामध्ये नैराश्याचे वातावरण पसरले असून याच नैराश्यापोटी बीड येथील भावसार समाजातील

## शासन दरबारी टाहो करण्यासाठी बळीराजा सज्ज

# किसान सभेच्या नेतृत्वात बळीराजा एक

परळी / प्रतिनिधी

यंदाच्या खरीप पूर्व आणि खरिपात झालेली अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात शेती, शेतीपिक, माती आणि शेतमजूर यांचे अतोनात हाल झाले असून अद्याप देखील दगडाचे काळजी असलेल्या मस्तवाल सत्ताधारी आणि प्रशासन यांना या प्रश्नी कसलाच कळवळा नसल्याने मराठवाड्यातील शेतकरी उद्या मंगळवार दि ३० रोजी संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयावर आपला टाहो फोडून आक्रोश करणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील शेकडो गावातील शेतकरी मोठ्या संख्येने किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकत्र झाले आहेत. अनेक तालुक्यातील



गावागावात शेतकरी, शेत मजूर,कामगार, युवक एकत्र येत या आक्रोश मोर्च्याची तयारी करत आहेत.

राज्यात अनेक भागात खरीप पूर्ण एप्रिल-मे मधील अवकाळी आणि खरिपाच्या जुलै-ऑगस्ट मध्ये झालेली अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. सप्टेंबर महिन्यात राज्यात आणि जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी होऊन शेती, शेती पीक, शेती अवजारे, पशुधन यांची मोठी हानी झाली. पिढ्यानपिढ्या भरपाई होणार नाही असे शेतीचे नुकसान झाले असून सरकारने सप्टेंबर मध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी न करता जुलै-ऑगस्ट मधील नुकसानीची केलेली २ हजार २०० कोटी मदत देणारे आमचे सरकार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री सांगत आहेत. जिल्ह्यात सप्टेंबर अखेर झालेल्या अतिवृष्टी आणि अतिवृष्टीमुळे आलेला पूर यामुळे लाखो हेक्टरवरील पिकासह अक्षरशः शेती वाहून गेलेली असताना सत्ताधारी मंडळी फक्त पाहणी दौरा करत आहेत. सरसगट कर्ज माफी करून बाधित क्षेत्रात ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ सर्वोतोपरी मदत विनाविलंब शेतकऱ्यांना द्यावी अशी मागणीकरिता मराठवाड्यातील शेतकरी, शेत मजूर, कामगार हजारोंच्या संख्येने संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयावर धडकून आपला आक्रोश सरकार समोर व्यक्त करणार आहेत. या आक्रोश मोर्च्याची गावोगावी जय्यत तयारी सुरू असून शेतकरी, शेतमजूर यांच्यासह युवक, विद्यार्थी देखील आता सरकारच्या उदासीन भूमीविरोधात पेटून उठले आहेत. मंगळवार दि ३० रोजी होणाऱ्या आक्रोश मोर्च्याच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात किसान सभेच्या नेतृत्वाखाली एकजुट झाली असून मस्तवाल सरकारचे डोके जागेवर आणण्यासाठी हा आक्रोश मोर्चा असल्याचे शेतकरी सांगत आहेत.


## लाडक्या बहिणींना दिवाळीला दोन हप्ते द्या, माजलगावात ओला

# दुष्काळ जाहीर करा

उपसरपंच अनिल राधे कांबळे

माजलगाव /प्रतिनिधी : लाडक्या बहिणींना केवायसी केल्यानंतर हप्ता दिला जाईल असे शासन सांगत आहे परंतु दिवाळीला एकत्रित दोन हप्ते द्या व माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या अशी मागणी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी शासनाकडे केले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई केवायसी करा त्यानंतर लाभ मिळेल असे संकेत शासनाने दिले आहेत परंतु ऐन सणासुदीच्या काळात ई केवायसी चे फर्मान शासनाने काढल्याने अनेक पात्र लाभार्थी महिला वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने दिवाळीनंतर ई केवायसी अनिवार्य करावी व दिवाळीला एकत्रित दोन हफ्त्यांचा लाभ द्यावा तसेच मागील दोन दिवसांपासून अतिवृष्टी व



ढगफुटी सारखा पाऊस शहरासह तालुक्यात बरसत आहे. खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्यात वेळ न घालवता तात्काळ शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्या अशी मागणीही उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी केली आहे.


## प्रियदर्शनी क्रीडा मंडळ व रोट्रॅक्ट क्लबच्या वतीने आयोजित

# अंबाजोगाई दांडिया फेस्टिव्हल २०२५ चा शानदार शुभारंभ

### पावसाच्या सरी बरोबरच स्पर्धकांनी लुटला दांडियाचा आनंद

अंबाजोगाई (प्रतिनिधी):-अंबाजोगाई शहराची सांस्कृतिक शैक्षणिक व क्रीडा संस्कृती सदैव जोपासणारे प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ तथा रोट्रॅक्ट क्लब च्या वतीने आयोजित अंबाजोगाई दांडीया महोत्सव २०२५ चा शुभारंभ शनिवारी दि २७ रोजी शहरातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी संयोजक राजकिशोर मोदी, संकेत मोदी, डिंपल मोदी यांच्यासह प्राचार्य बी आय खडकभावी, डॉ दीपक पाटील, डॉ स्वाती शिंदे, साई फड, विवेक मस्के, आदर्श कर्णावट, समीर फड, रुपेश चव्हाण,बालाजी कदम,जुगलकिशोर सारडा, सम्यक कर्णावत , जयदेव पारीख, पल्लवी दरगड, वर्धमान कोंडेकर, राहुल कऱ्हाड, सौरभ चौबारकर, सावित्री मुंडे, अरबाज शेख, तसेच धनराज सोळंकी आदी शहरातील मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेची सुरुवात अंबाजोगाई चे ग्रामदैवत माता योगेश्वरी, माँ दुर्गा देवीचे पूजन तसेच आरती करून करण्यात आली. मंडळाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या अंबाजोगाई दांडिया महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. मागील वर्षी देखील दांडिया महोत्सव हा अतिशय उत्साह व जल्लोषात संपन्न झाला होता. यावेळी सहभागी तसेच विजेत्या स्पर्धकांना १५० च्या वर बक्षिसांच्या स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या होत्या. जवळपास ४५० ते ५०० दांडिया स्पर्धक या स्पर्धेत



सहभागी झाले होते. यावेळेस देखील तोच उत्साह व जल्लोष दांडीत प्रेमींमध्ये पहावयास मिळत आहे. भरगोस अशा बक्षिसांची देखील लयलूट यावर्षी देखिल केल्या जात आहे. ५ ते १० वर्षाच्या लहान मुलांसह मोठ्या वयोगटातील महिला व पुरूष हे या दांडिया स्पर्धेत सहभागी झाले आहेत. स्पर्धेत सहभागी होत असलेले स्पर्धक हे विविध वेशभूषा परिधान करून परीक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत . यामध्ये महाराष्ट्रीयन, पाश्चिमात्य , संत विभूती त्याचबरोबर चित्रपटातील कलाकारांच्या देखील वेशभूषा साकारून या दांडिया स्पर्धेचा आनंद लुटत होते.

विजेत्या स्पर्धकांची निवड करण्यासाठी अनुभवी परीक्षकाना पाचारण करण्यात आले आहे. तसेच संचलनासाठी पुणे येथून कु तेजस्वी हि अतिशय उच्च दर्जाचे संचलन करत आहे. प्रियदर्शनी क्रीडा मंडळ व रोट्रॅक्ट क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या अंबाजोगाई दांडिया महोत्सव-२०२५ साठी आयोजकांनी अतिशय उत्तम दर्जाची लायटिंग ,साउंड सिस्टीम तसेच आलेल्या महिला स्पर्धकांसाठी सेल्फी पॉईंट, तात्काळ फोटो प्रिंट मिळण्याची व्यवस्था देखील स्पर्धेच्या ठिकाणी आयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी करून दिली आहे.

## औदुंबर मेडिकलचे धस,दरेकर,धोंडे यांच्या शुभहस्ते उद्घाटन संपन्न

आष्टी (प्रतिनिधी) बीड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाबासाहेब मुळीक यांचे जावाई तथा सेवानिवृत पीएसआय विठ्ठल नरवडे यांचे चिरंजीव जयदीप नरवडे यांच्या आष्टी शहरातील औदुंबर मेडिकलचे उद्घाटन रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. भीमराव धोंडे, युवानेते जयदत्त धस यांच्या शुभहस्ते झाले.

या कार्यक्रमास माजी सभापती देविदास धस, माजी सभापती उद्धवबापु दरेकर, माजी सभापती बद्रीनाथ जगताप, विठ्ठलराव बनसोडे, गणेश शिंदे, किशोरनाना हंबर्डे, लालाभाऊ कुमकर, अण्णासाहेब चौधरी, चेअरमन शांतीलाल भोसले, नामदेव राऊत, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, सरपंच अशोक मुळे, खंडूदादा जाधव, सुनील रेडेकर, गणेश पोकळे, रावसाहेब शिरसाट, रावसाहेब लोखंडे, बाबासाहेब मुळीक, वि. भा. साळुंके, चेअरमन अरुण सायकड, सतिषमामा जंगले, जालिंदर श्रीखंडे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, शरद रेडेकर, अनंत हंबर्डे, समाजसेवक विजय गोल्हार, डॉ. शिवाजी राऊत, संजय गाढवे, बबलुशेठ तांबोळी, सरपंच मनोजशेठ



गाढवे, गोरक्षनाथ सायकड, सरपंच प्रल्हाद मुळीक, प्राचार्य रविकांत सुंबरे, सिताराम पोकळे, डॉ. बाबासाहेब मुटकुळे, डॉ. काकडे, सुरेश पवार, राजेंद्र लाड, एम. बी. तळेकर, पोपट बोराडे, दत्तात्रय तळेकर, मच्छिंद्र पवार, संभाजी झांजे, सदाशिव घुमरे, उध्दव सोनवणे, अशोक कर्डीले, शाहूराजे झांजे, नागेश मुळीक, महादेव झांजे तसेच सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीतांचे स्वागत विठ्ठल नरवडे, बाबासाहेब मुळीक, सुशांत नरवडे, जयदीप नरवडे यांनी केले.

## दबंग सरपंच किशोर नागरगोजे यांची शानदार कामगिरी नदी पात्रात उतरून गावकऱ्यांची विद्युत सेवा केली सुरळीत

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोद्यात अतिवृष्टीमुळे पूराचा प्रचंड तांडव सुरू असताना येवलवाडी गावावर मोठा संकटाचा डोंगर कोसळला. विजेच्या तारांवर पूरामुळे झाड कोसळल्याने संपूर्ण गाव आठ दिवस संपूर्ण अंधारात बुडाले.आठ दिवस ज्या आठ दिवसांत विद्यार्थी शाळेत शिक्षण घेऊ शकले नाहीत, शेतकरी शेतात काम करू शकले नाहीत, आणि महिलांना घरगुती कामं करणे खूपच अवघड झाले. या काळोखामुळे फक्त येवलवाडीच नव्हे, तर आसपासच्या चार ते पाच गावांमध्येही अंधार पसरला होता.संकटाच्या या कठीण वेळेस सरपंच किशोर नागरगोजे यांनी गावासाठी धोका पत्करणे गरजेचे आहे असे ठरवून धाडसी पाऊल उचलले. त्यांनी गावकऱ्यांना एकत्र केले आणि सर्वांनी मिळून नदीच्या पत्रात उतरून झाड तोडण्याचे कठीण आणि धोकादायक काम हाती घेतले. वाहणाऱ्या पाण्याचा प्रचंड प्रवाह आणि जीविताला धोका असतानाही सरपंच आणि गावकरी आपापल्या धैर्याचे आणि निष्ठेचे प्रदर्शन करत होते.गावकरी आणि सरपंचांनी एकजुटीने केलेल्या प्रयत्नांमुळे अखेर विजेच्या तारांवर अडथळा निर्माण



करणारे झाड यशस्वीरित्या काढले गेले. विजेची सेवा पुन्हा सुरळीत झाली आणि संपूर्ण येवलवाडी गाव उजेडात न्हालाले. तसेच, या धाडसामुळे आसपासच्या चार ते पाच गावांमध्येही प्रकाश परत आला, जीवन पुन्हा सुरळीत झाले. यामुळे गावकऱ्यांनी आनंदात जल्लोष केला. मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण सरपंचांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक करत होते सरपंच किशोर नागरगोजे यांनी दाखवलेले धैर्य, संकटावर मात करण्याची तयारी, आणि जनहितासाठी असलेली निष्ठा आज संपूर्ण परिसरात आदर्श ठरत आहे. संकटसमयी गावकऱ्यांसोबत हातमिळवणी करत करून केलेले काम आणि संकटावर मात करण्याची त्यांची धडपड हे येवलवाडीच्या इतिहासात नेहमी स्मरणात राहणार आहे.या घटनाक्रमामुळे नागरिकांमध्ये जनसेवेच्या मूल्याची जाणीव जागृत झाली आहे. सरपंच नागरगोजे हे फक्त नेतेच नाहीत, तर संकटात उभे राहणारे, धाडसी आणि निष्ठावंत नेतृत्वाचे प्रतीक ठरले आहेत.

## शिरूर शहरातील पूरग्रस्तांना नाम फाउंडेशनचा आधार

### तीस कुटुंबांना दिला किराणा

मानूर /प्रतिनिधी

शिरूर शहरामध्ये सिंदफणा नदीला आलेल्या महापुरामुळे प्रभाग क्रमांक नऊ मधील रहिवाशांचे संसार पाण्यात वाहून गेले होते.सदरील रहिवाशांना नाम फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात देण्यात आला असून सोमवारी सकाळी त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सिद्धेश्वर संस्थानवर करण्यात आले.तालुक्यातील रुपुर येथील रहिवासी तथा कळसंबर येथील आपला परिवार या सामाजिक प्रकल्पाच्या संचालिका



मनिषाताई पवार यांच्या माध्यमातून या मदतीचे वाटप झाले.शहरातील तीस कुटुंबांना या मदतीचे वाटप करण्यात आले.या वेळी नगरसेवक अरुण भालेराव,अमोल चव्हाण,पत्रकार गोकुळ पवार,दिनेश गाडेकर,प्रताप कातखडे,अक्षय रणखांब,सागर केदार,संजय गायकवाड,अजय कुचेरिया, अनिल जगताप यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित मान्यवर

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सरकारला जागे करण्यासाठी धनगरांचा रणघोष!

## बदनापूर येथे आ.नारायण कुचे यांच्या कार्यालयावर ढोलबजाव आंदोलन मुख्यमंत्र्यांना दिला थेट इशारा



बदनापूर /प्रतिनिधी :-धनगर समाजाच्या एस.टी.आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाने आज बदनापूरात भीषण स्वरूप धारण केले. आमदार नारायण कुचे यांच्या कार्यालयावर समाजबांधवांनी ढोलबजाव आंदोलन करत घोषणांचा तुफान वर्षाव केला. जय मल्हार, जय अहिल्यादेवी, जय फुले-शाहू-आंबेडकर, जय संविधान या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

आंदोलनाचा आज १३ वा दिवस असून संतापाची लाट प्रचंड उफाळून आली आहे. संघर्षयोद्धे दीपक भाऊ बोराडे यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी जमलेल्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी उपस्थित राहून भूमिका स्पष्ट केलीच पाहिजे.अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करून सरकारला अस्थिर केले जाईल.

धनगर समाजाच्या प्रतिनिधींनी आमदार नारायण कुचे यांना निवेदन देत ठाम मागण्या मांडल्या एस.टी. आरक्षणाची अंमलबजावणी तातडीने व्हावीसरकारने वेळकाढूपणा थांबवून न्याय द्यावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपोषण स्थळी हजर राहून आपली भूमिका स्पष्ट करावी

यावेळी समाजनेत्यांनी सरकारला थेट इशारा दिला

सरकार आमच्या भावनांशी खेळ करत असेल, तर धनगर समाज रस्त्यावर उतरेल. हा इशारा नाही, रणशिंग फुंकल्याची सुरुवात आहे.ढोलताशांच्या निनादाने आणि संतप्त घोषणांनी संपूर्ण बदनापूर दणाणून गेले. आंदोलनाचा जोर एवढा प्रचंड होता की प्रशासन हादरून गेले, तर परिसरात मोठी गर्दी उसळून वातावरण चिघळले.धनगर समाजाचे हे आंदोलन केवळ एक निदर्शने नसून सरकारच्या गादीला हादरा देणारी धोक्याची घंटा ठरत आहे.

## श्री मत्स्योदरी देवी मंदिरातील चोरीस गेलेले ६० हजार रुपये ड. कृष्ण शर्मा यांच्या विनामूल्य सेवेमुळे संस्थानाला परत



अंबड/ प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या श्री मत्स्योदरी देवी मंदिरातील दानपेटी फोडून चोरीस गेलेले तब्बल साठ हजार रुपये अखेर मंदिराला परत मिळाले आहेत. विशेष म्हणजे हे प्रकरण न्यायालयात मांडताना ड. कृष्ण नंदलाल शर्मा यांनी विनामूल्य सेवा करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.दानपेटी फोडून चोरट्यांनी भक्तांनी देवीच्या चरणी अर्पण केलेले ६०,०००/- रुपये लंपास केले होते. या संदर्भात मंदिर संस्थानाचे व्यवस्थापक कैलास शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व अंबड पोलिसांनी चोख तपास करून ५ आरोपींना ताब्यात घेतले व चोरीस गेलेले संपूर्ण पैसे जप्त केले.जप्त पैसे परत मिळवण्यासाठी संस्थानाच्या वतीने अध्यक्ष व मा. तहसीलदार अंबड यांनी ठराव घेऊन व्यवस्थापक कैलास शिंदे यांची निवड केली. त्यानंतर ड. कृष्ण शर्मा यांनी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अंबड न्यायालयात कलम ५०३ बी.एन.एस.एस. नुसार अर्ज दाखल केला.

सदर अर्जावर युक्तिवाद होऊन मा. न्यायाधीश श्वेता परिहार यांनी मंदिर संस्थानाच्या बाजूने निर्णय देत पैसे परत करण्याचा आदेश दिला.

नवरात्रोत्सवाच्या मुहूर्तावर मंजूर आदेशाचे पत्र माजी आरोग्य मंत्री राजेशभैया टोपे यांच्या हस्ते व्यवस्थापक कैलास शिंदे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थानाचे कर्मचारी व असंख्य भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## केजच्या जीवन शिक्षण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे जिल्हा स्तरीय जलतरण स्पर्धेत चमकदार यश

केज/प्रतिनिधी

दिनांक २४ सप्टेंबर २०२५रोजी बीड जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत केज येथील जीवन शिक्षण प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत बीड जिल्ह्यात आपला ठसा उमटवला.या स्पर्धेत इयत्ता दहावीतील विद्यार्थी चि.केदार निलेश श्रीकांत याने अप्रतिम कौशल्य दाखवत जलतरण प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.त्याच्या या उत्तुंग यशामुळे विद्यालयाचा लौकिक उंचावला असून संस्थेचा सर्व शिक्षकवर्ग,विद्यार्थी व पालकांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.या कामगिरीमध्ये क्रीडा मार्गदर्शक साजेद पठाण सर,भीमाशंकर तोंडसे सर,अश्विनी दळवे मॅडम व किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.आगामी विभागीय स्पर्धेतही चि.केदार श्रीकांत अधिक मोठे यश मिळवेल,असा विश्वास व्यक्त करत संस्थेचे सचिव हारूनभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार,मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे सर, बन्सल क्लासेसचे सह संचालक गोविंद ठोंबरे सर तसेच मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे सर यांनी खेळाडूस हार्दिक शुभेच्छा दिल्या.संस्थेचा हा अभिमानास्पद क्षण केज परिसरात व क्रीडा क्षेत्रात सर्वत्र कौतुकास्पद ठरत असून चि.केदार श्रीकांत याच्याकडून विभागीय तसेच राज्य स्तरीय स्पर्धेतही यशाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बीड जिल्हा अतिवृष्टीमुळे शैक्षणिक शुल्क माफ करावे- सज्जाद सय्यद

पाटोदा /प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यात अतिवृष्टी अति पाऊस ,पूर परिस्थिती मुळे अधिक नुकसान झाले आहे. व शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे मजुरांचे कामगारांचे पूर परिस्थितीमुळे होणारे हाल आणि वाहून गेलेले घर -संसार, अन्नधान्य व कष्टकरी मजुरांना हाताला काम नसल्याने बीड जिल्हा तसेच जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना पुराचा आणि अतिवृष्टीचे जास्त प्रमाणात नुकसान झाल्याने हदबल असलेला शेतकरी कष्टकरी व कामगार मजुर अत्यंत बिकट संकटात असून सध्या तरी स्वतःच्या मुला- मुलीचे शिक्षणाचा खर्च चालणार कसा हा प्रश्न सर्वात मोठा निर्माण झाला आहे. आणि अशाच परिस्थितीमध्ये जिल्ह्यामध्ये महाविद्यालय मोठ्या प्रमाणात असून विविध अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क जास्त असल्याने तसेच परीक्षा मंडळ व विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क हे अधिकच्या प्रमाणात असल्याने सध्या तरी शासनाने अतिवृष्टी बीड जिल्ह्यामध्ये ज्या तालुक्यांमध्ये जास्तीत -जास्त प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे .त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सहकारी संस्था संचालक- सय्यद सज्जाद यांनी केली आहे.





## बनसारोळा येथील शेतकरी बांधवांसाठी श्रध्दा जोगदंडचा आदर्श उपक्रम

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची इयत्ता आठवी 'अ' मधील विद्यार्थिनी श्रद्धा अनिल जोगदंड हिने विलक्षण समाजभान दाखवत आदर्श घालून दिला आहे.आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी पिगी बँकेत जमा केलेले पैसे तिने खर्च न करता, अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे सुपूर्द केले. तिने हा निधी डॉ. अशोकराव थोरात यांच्या स्वाधीन केला.

श्रद्धाच्या या सामाजिक जाणिवेच्या कृतीचे सर्वत्र कौतुक होत असून,लहानग्या वयात दाखविलेला हा मोठा त्याग सर्व विद्यार्थ्यां साठी व समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गावकऱ्यांसह शिक्षक, शाळा व्यवस्थापन व स्थानिक मंडळींनी तिच्या उपक्रमाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.श्रद्धाने दाखवलेला हा आदर्श समाजातसंवेदनशीलता व परोपकाराची नवी उमेद निर्माण करणारा आहे.

# गरिबांचे घरकुल साकार करण्यासाठी आ. सुरेश धस यांचा पुढाकार



पाटोदा (आजीज शेख ) गोरगरिबांच्या डोळ्यात वर्षानुवर्षे दडलेले आपल्या घराचे स्वप्न आता साकार होत असून त्यामागे लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा व अथक प्रयत्न हेच प्रमुख कारण असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत पाटोदा नगरपंचायत हद्दीतील पहिल्या टप्प्यात तब्बल ११० गोरगरिबांना घरकुलांची मंजुरी मिळाली आहे. मंजूर झालेल्या घरकुलांतील लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बांधकाम परवाने घेऊन तात्काळ आपापले बांधकाम सुरू करावे असे आवाहन नगराध्यक्षा दीपाली जाधव, उपनगराध्यक्ष रोहिदास गीते, गटनेते, सभापती, उपसभापती, नगरसेवक तसेच मुख्याधिकारी अभय कुमार जोशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत पाटोदा शहरातील घरकुलांच्या मंजुरीसाठी आमदार सुरेश धस यांनी राज्य व केंद्र सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नामुळे यापूर्वीच्या टप्प्यांमध्येच सुमारे ११०० गोरगरीब नागरिकांच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाले आहे आणि त्या यशस्वी परंपरेत भर घालत आता पुन्हा नव्याने ११० घरकुलांना प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. या योजनेत प्रत्येक लाभार्थ्याला अडीच लाख रुपयांचे अनुदान मिळणार असून हे अनुदान घरकुल उभारणीसाठी मोठा हातभार ठरणार आहे. भाड्याच्या घरात राहणारे, अस्थिर

जीवन जगणारे कुटुंब आपल्या हक्काचे घर मिळवून स्थिरतेकडे वाटचाल करणार आहेत. आतापर्यंत ११०० घरकुलांद्वारे स्वप्नपूर्ती झाली असून नव्याने मिळालेल्या ११० मंजुरींमुळे या आकड्याला आणखी बळ मिळाले आहे. भविष्यात उर्वरित पात्र कुटुंबांसाठीही लवकरच सर्वेक्षण करून प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. या यशामागे आमदार सुरेश अण्णा धस यांची जनहिताची जाण, सातत्यपूर्ण धडपड आणि गोरगरिबांविषयीची तळमळ दिसून येते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज हजारो नागरिकांचे घराचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले असून पाटोदा शहरात आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.


## अतिवृष्टी नुकसानभरपाईत पाटोदा तालुक्याला सरसकट मदत मिळणार - आमदार सुरेश धस

### शेतकऱ्यांना पंचनाम्याची गरज नाही; सर्व महसूल मंडळातील शेतकरी पात्र

पाटोदा -प्रतिनिधी

पाटोदा तालुका पुन्हा एकदा अतिवृष्टीच्या संकटाने तडाखा बसलेला आहे. पाटोदा, अमळनेर, थेरला आणि दासखेड या चारही महसूल मंडळांमध्ये मागील काही दिवसांत ढगफुटी सदृश्य पावसाने धुमाकूळ घातला. दोन-दोन वेळा झालेल्या या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची संपूर्ण पिके पाण्याखाली गेली असून, शंभर टक्के हानी झाली आहे. या पार्श्वभूमीवर पाटोदा तालुका संपूर्णपणे नुकसानभरपाईसाठी पात्र ठरला असल्याची महत्त्वपूर्ण माहिती आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली आहे.

आमदार धस म्हणाले, तालुक्यातील चारही महसूल मंडळांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कुठेही पिके शिल्लक राहिलेली नाहीत. त्यामुळे पंचनाम्याच्या संदर्भात शेतकऱ्यांमध्ये जो संभ्रम आहे, तो दूर व्हावा. पिकांच्या नुकसानीसाठी कोणत्याही प्रकारचे पंचनामे करण्याची आवश्यकता नाही. आपण वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई मिळणार आहे.पंचनामे केवळ ज्या ठिकाणी पूर्णतः जमीन खरडून गेली आहे, घरांची पडझड झाली आहे किंवा घरात पाणी शिरून जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणीच केले जाणार आहेत.



परंतु शेतीपिकांच्या बाबतीत कोणत्याही शेतकऱ्याला पंचनाम्याची गरज नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी कुठलाही गोंधळ न करता प्रशासनाकडून मिळणाऱ्या मदतीची वाट पहावी.

आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट केले की, प्रशासन आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याशी सतत संपर्क ठेवून या नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची योग्य ती आणि सरसकट भरपाई मिळणारच आहे. यासाठी शेतकऱ्यांनी कोणतीही चिंता करू नये.अतिवृष्टीमुळे होरपळून निघालेल्या शेतकऱ्यांसाठी आमदार धस यांची ही घोषणा दिलासादायक ठरत असून, पंचनाम्याचा अडथळा दूर झाल्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे.

# स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरात ४० वर्षांपूर्वी काही शिक्षकांनी एकत्र येऊन आपल्या शिक्षक बांधवांची बचत तथा अडचणीच्या काळासाठी मदत व्हावी या उद्देशाने निर्माण केलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८ रोजी सर्व सभासद शिक्षकांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाली. स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभा ही माजी केंद्र प्रमुख रामरावजी मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.तर प्रमुख अतिथी शिक्षक नेते चंद्रकांत साबळे , बबनराव घुले सर, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष,सामाजिक कार्यकर्ते विजय रापतवार, केंद्रीय मुख्याध्यापक आवाड रामराजा ,केंद्र प्रमुख फारुख मनियार , शिक्षक नेते दयाराम दराडे, नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव , उपाध्यक्ष ,कोषाध्यक्ष व अन्य संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते.

याप्रसंगी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मागील काळात संस्थेत झालेल्या अपहाराची न्यायालयीन चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी आम्ही तुमच्या सोबत आहोत असा शब्द दिला. मागील काळात या पतसंस्थेमध्ये भ्रष्टाचार



झाल्याचे कायद्याने सिद्ध झाले आहे. सन २०१२ ते २०१७ चे संचालक मंडळ व २००१ ते २०१२ या दरम्यान पदाधिकारी, बँक अधिकारी कर्मचारी , संस्था कर्मचारी यांनी संगनमताने केलेला आहे . जे कोणीही या अफरातफर करण्यात दोषी आढळेल त्यांना कायद्याने शिक्षा होऊन आपल्या पतसंस्थेची कर्जवसुली झाली पाहिजे .

ज्या सभासदा कडे संस्थेचे कर्ज आहे त्यांनी लवकरात लवकर भरून सहकार्य करावे,जेणेकरून गेल्या चार ते पाच वर्षांपासून सेवानिवृत्त झालेल्या सभासदांना त्यांच्या भाग भांडवलाची रक्कम परत देता येईल. त्यामुळे पतसंस्थेचे व्यवहार सुरळीत चालू होतील असेही सांगितले तसेच एक रकमी कर्ज भरणाऱ्या सभासदांना व्याजात सुट द्या अशी मागणीही यावेळी केली.या सभेप्रसंगी श्रीमती टिळेकर मॅडम यांनी मला बोगस बँक भरणा पावती देऊन फसवणूक कशी केली व कोणी केली हे नावासहीत सांगितले. भारत शेरेकर यांनी सर्व सभासद बांधवानी आपनाकडे थकीत राहीलेली रक्कम असेल तर तात्काळ भरावी असे अवाहन केले.दयाराम दराडे यांनी संस्थेचा लेखापरीक्षण पर्यंतचा प्रवास सांगितला .अध्यक्ष,सचिव यांनी सर्व सभासद यांनी विचारलेल्या प्रश्नांना सकारात्मक उत्तर दिली.

कोषाध्यक्ष उमाप संजिव कचरू यांनी आजच्या बैठकीत घेण्यात येणारे ठरावाचे उपस्थित समोर वाचन केले .या कार्यक्रमाचे बहारदार संचलन शिक्षक नेते, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे यांनी केले तर आभार नवनिर्वाचित संचालक पुरी सर यांनी मानले. सभेसाठी १५० सभासद उपस्थित होते.

# तालुक्यात मुसळधार पाऊस; सततच्या पावसामुळे हातची आलेली पिके गेली वाया शेती आणि जन जिवन विस्कळीत

## शहरातून वाहणारी पूर्णा नदी दुथडी भरून वाहत आहे; नदीकाठच्या गावांना सतर्क राहण्याच्या प्रशासनाच्या वतीने सूचना





**पंचनामे न करता सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा**

यावर्षी पीक पाणी चांगले आले होते काही देणे घेणे होईल या आशेवर शेतकरी होते, अचानक परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे काही क्षणातच होत्याचं नव्हतं झालं आणि उभ्या डोळ्यांनी पाहिलेल स्वप्न मातीमोल होऊन नष्ट झालं . सरकार ने भरीव मदत जाहीर करावे आणि जालना जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करावा

**-राजु पाटील वाकडे शेतकरी**
(प्रगतशिल शेतकरी)

अतिवृष्टीमुळे शेतकरी पुर्णपने उद्ध्वस्त झाला आहे,पुर्णवर्षभराचे पिक वाया गेले , शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीसाठी पैसे खर्च केले आहेत, त्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे हीच ती वेळ आहे सरकारने पंचनामे न करता सरसकट शेतकर्याना मदत जाहीर करावी.
अतिवृष्टीमुळे शेतकरी पुर्णपने उद्ध्वस्त झाला आहे,पुर्णवर्षभराचे पिक वाया गेले , शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीसाठी पैसे खर्च केले आहेत, त्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे हीच ती वेळ आहे सरकारने पंचनामे न करता सरसकट शेतकर्याना मदत जाहीर करावे

**शंकर पाटील तागमोघे शेतकरी**

**ओला दुष्काळ जाहीर करावा**
**परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला**

असून शेतकरी राजा पूर्णपणे जमीनदोस्त झाला आहे, तात्काळ राज्यकर्त्यांनी सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा

-रमेश वाघमारे, शेतकरी

जाफराबाद /हरी भालके

जाफराबाद तालुक्यात मुसळधार पाऊस आणि सततच्या पावसामुळे पिके पिवळी पडली आहे. तर काल रात्री पडत असलेल्या पावसामुळे जाफराबाद तालुक्यातील पुर्णा ,धामणा, केळना, अशा छोट्या मोठ्या नद्यांना पूर आल्याने नदी काठील शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी शिरल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे त्यामध्ये शिपोरा अंभोरा, भराडखेडा,हनुमंत खेडा, सावंगी,देऊळझरी,वरुड बुद्रुक, बोरखेडी चिंच, भातोडी, जवखेडा ठेंग, वरखेडा विरो,खामखेडा,निमखेडा बुद्रुक, ब्रह्मपुरी,नळविहीरा, टाकळी, विरखेडा भालके,जाफराबाद शहरासह अनेक गावांत पुराचे पाणी शिरून अशी परिस्थिती निर्माण झाली आहे .. सोयाबीन मक्का, कपाशी , तूर मोठ्या प्रमाणात वाहून गेली, आहे तर काही शेतकऱ्यांची शेतामध्ये टोंगळे इतके पाणी साचले असल्याने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, तर काही ठिकाणी नदीचे पाणी शेतात घुसल्याने शेतीमधील पाण्याच्या प्रवाहाने थडी वाहून दिल्याचाही प्रकार घडला आहे या पडत असलेल्या आधी पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे आता फक्त सरसकट पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करून मोठ्या प्रमाणात नुकसान भरपाई मिळावी या आशेने शेतकरी शासनाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहे. या वर्षी मे महिन्या पासूनच पावसाला सुरूवात झालेली असुन जुन मध्ये वेळेवर पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीपाच्या पिकाची पेरणी केली होती या परीसरात सोयाबीन, कापूस, उडीद, मुग, हळद पिक जास्त प्रमाण असुन पिकांची परिस्थितीही चांगली होती परंतु सतत पाऊस पडत असल्यामुळे सोयाबीन, कापूस, हळद, पिके पिवळी पडलेली दिसून येत आहे. रात्रीच्यापासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन पिक पाण्याखाली गेलेल आहे,जाफराबाद शहरातुन वाहणारी पूर्णा नदी दोन्ही थडी भरून धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहे नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून शेतात नदी काठावर बांधलेली जनावरे तसेच शेतकऱ्यांनी सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहे. अगोदरच सतत होत असलेल्या पावसामुळे पिक पिवळी पडली अशातच मधुन मधुन परतीच्या अवकाळी पावसाने केलेला कहर त्यामुळे सोयाबीन,

कापूस, तुर व इतर पिकांच्या उत्पादनांत प्रचंड घट होऊन शेतकऱ्यांच्या हातात काही लागण्याची आशा आता जवळ जवळ मावळलेली आहे. या वर्षी सतत जास्त पाऊस पडत असल्यामुळे सोयाबीन, कापूस, तुर,मूग, हळद व नेट शेड मध्ये असलेली पिके पूर्णपणे नाहीसे होण्याची भिती शेतकऱ्यांच्या मनामध्ये आहेच दरवर्षी पेक्षा सरासरी जास्त पाऊस पडला, नदी नाले ओसंडून वाहत आहेत. तालुक्यात परिसरामध्ये अतिवृष्टी सदृश्य मोठ्या प्रमाणात पाऊस, तर काही ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यामुळे ओला दुष्काळ घोषित करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट शेतकऱ्यांना आर्थिक मदत घोषित करावी अशी मागणी शेतकरी करीत आहे.

---



## एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी धनगर समाजाचे आमदार-खासदारांच्या दारी ढोल वाजवत आंदोलन

### नांदेड लोकसभेचे खासदार मा. रवींद्र चव्हाण यांचा आरक्षणाला जाहीर पाठिंबा असल्याचे दिले पत्रक



धर्माबाद(अशोक पडोळे)

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी राज्यभर धनगर समाज वेळोवेळी आंदोलन करत आहे. त्याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. धनगर समाजाच्या जमातीला लागू असलेले आरक्षण संदर्भात अंमलबजावणी करावी. तसेच घटनेत असलेले एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यात यावे यासाठी जालना येथे १३ दिवसापासून उपोषण करीत असलेले दीपक बोऱ्हाडे यांना पाठींबा देण्यासाठी व त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी. यासाठी तालुका धनगर समाजाच्या वतीने नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार व लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या घरासमोर ढोल वाजवून आंदोलन करून त्यांना निवेदन देण्यात आले. तसेच आगामी काळात आंदोलन तीव्र करण्याच्या इशारा देण्यात आला.

धनगर समाजाला तात्काळ एस.टी. प्रवर्गातील आरक्षण देण्यात यावे अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. २ दिवसांत दिपक बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास १ ऑक्टोबररोजी रस्त्यावर उतरून नांदेड जिल्ह्यात रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. पुढील आंदोलनाची दिशा दिपक बोऱ्हाडे सांगतील त्या पद्धतीने राहणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. यानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन आमदार व खासदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.यावेळी समाज बांधवांच्या वतीने यळकोट येळकोट 'जय मल्हार , धनगर एस.टी आरक्षण अंबलबजावणी झालीच पाहिजे , धनगर एकजुटीचा' विजय असो, अशा घोषणा देत आहेत. धर्माबाद येथील शेकडो धनगर समाज बांधव या ठिकाणी उपस्थित आहे.

## पावसामुळे शेतीसह संपूर्ण रोशनगावकरील येथील गावकऱ्यांचा सामूहिक जलसमाधीचा प्रयत्न!

### शासन प्रशासन हादरले उपजिल्हाधिकारी तहसीलदार यांचे बारकाई चे लक्ष

धर्माबाद-( अशोक पडोळे ) यावर्षी सतत पाचव्यांदा गोदावरी नदीने रौद्ररूप धारण केले असून तद्वतच सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे व बॅक वॉटर मुळे रोशनगाव धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथील संपूर्ण शेत जमीन व पिके पाण्याखाली जाऊन उध्वस्त झाले एक एकर सुद्धा जमीन नुकसानी पासून शिल्लक राहिली नाही. त्यामुळे आज रोशन गाव येथील आबाद वृद्ध व सर्व स्त्री पुरुषांनी मिळून सामूहिक जलसमाधीचा प्रयत्न केला. पण तहसीलदार सुरेखा स्वामी ह्या तात्काळ तिथे पोहोचून शेतकऱ्यांना दिलासा दिल्यामुळे पुढील अनर्थ टळला असला तरी जलसमाधीच्या प्रयत्नात अनेकांच्या तोंडात नाकात पाणी जाऊन अत्यवस्थ असून सहा जणांना येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

शासनाच्या उदासीन धोरणामुळे आणि कुठलीही मदत शासनाची आजपर्यंत मिळाली नसल्यामुळे गाव उद्विग्न व झाले. हाता तोंडाशी आलेलं सोयाबीनचे पीक जमिनी दोस्त होताना सर्व जलमय होताना शेतकऱ्यांना उघड्या डोळ्यांनी पहावं लागतं यापेक्षा दुर्दैवी कुठलीही गोष्ट नाही. रोशनगाव येथील सर्व गावकऱ्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मावेजा द्यावा या मागणीसाठी वारंवार आंदोलन करून सुद्धा शासनाचा कुठल्याही प्रतिनिधी किंवा आमच्या गावाकडे फिरकला नाही आमची विचारपूस केला नाही या संतापाने संपूर्ण गावकऱ्यांनीचआज सामूहिकरीत्या जलसमाधी घेण्याचा निर्णय घेतलेला आहे.

भारतीय लोकशाहीमध्ये महाराष्ट्रातली ही पहिलीच घटना आहे. संपूर्ण गाव एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये जलसमाधी घेत असताना मात्र सरकार आणि लोकप्रतिनिधी निष्क्रियतेने बघत आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर पोहता न येत असल्यामुळे जलसमाधी घेण्याच्या प्रयत्नात नाकातोंडात पाणी जाऊन सहा जण अत्यवस्थ असून त्यांना येथील शासकीय रुग्णालयात उपचार चालू केले आहेत.

---

## तहसील कार्यालयात घाणीचे साम्राज्य



### अधिकारी व कर्मचारी बेजबाबदार, लोकप्रतिनिधी याकडे लक्ष देतील का?

घनसावंगी /मारोती सावंत

घनसावंगी तहसील कार्यालय म्हणजे घाणीचा अड्डा बनला आहे. तहसीलदारांच्या दारातच गुटखा-तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी माखलेल्या भिंती, ढिगभर कचरा, सडका वास आणि अस्वच्छ वातावरण हे सर्व पाहून नागरिक संतप्त आहेत. हे प्रशासन चालवणारे आहेत की घाणेरडे ठेकेदार ? असा जळजळीत सवाल लोक करत आहेत.भिंतींवर

स्वच्छता ही सेवा असे फलक लावून अधिकारी स्वतःला स्वच्छतेचे पुरस्कर्ते दाखवतात. पण वस्तुस्थिती अशी की, गुटखा-तंबाखू चघळणारे हेच कर्मचारी भिंतींवर पिचकाऱ्या मारून कार्यालय विद्रूप करत आहेत. नागरिकांचा संताप ओसंडून वाहतोय हे फोटोसेशनपुरते स्वच्छ भारत अभियान आहे, प्रत्यक्षात मात्र गुटखेबाजांचा महापूर सुरू आहे.

गेल्या कित्येक महिन्यांपासून अस्वच्छतेची तक्रार होत असली तरी अधिकारी मात्र डोळेझाक करून बसले आहेत. जे स्वतःचे कार्यालय स्वच्छ ठेवू शकत नाहीत, ते तालुक्याचा विकास काय करणार ? असा उपरोधिक सवाल जनतेकडून होत आहे. मौन बाळगणारे अधिकारी आणि मनमानी करणारे कर्मचारी दोघांच्या संगनमतामुळेच हे घाणीचे साम्राज्य टिकून आहे, असा आरोप नागरिक करत आहेत दररोज शेकडो नागरिक आपल्या कामासाठी तहसील कार्यालयात येतात. मात्र कामाऐवजी त्यांना घाण, पिचकाऱ्यांचा वास आणि दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. हे सर्व सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाशिवाय शक्यच नाही. नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू आहे.असे लोक उघडपणे म्हणू लागले आहेत.

आता लोकांचे लक्ष जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधींवर आहे. खरंच कारवाई करणार का ? की नेहमीप्रमाणे पाठीशी घालणार? हा प्रश्न जनतेसमोर उभा आहे.

नागरिकांनी इशारा दिला आहे जर लवकरच कठोर कारवाई झाली नाही, तर तहसील कार्यालयाबाहेर आंदोलन पेटवले जाईल.

## ग्राहकांना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सिनिअर इन्स्पेक्टर उबरहंडे, इन्स्पेक्टर भोपळे यांचा गोव्यात मान्यवरांनी गौरव केला

### ग्राहकांना उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल जिल्हा मध्यवर्ती बँकेचा गोव्यात डंका अधिकारी कर्मचाऱ्यांचा पारितोषके सन्मानपत्र देऊन केला गौरव




प्रतिनिधी : जाफराबाद

जिल्हा मध्यवर्ती बँक ग्राहकांचे हित पाहून उत्कृष्ट सेवा देत आहे त्यांच्या या उल्लेखणीय कामाबद्दल अधिकारी तथा कर्मचाऱ्यांना सलग आठ वर्षांपासून भव्यदिव्य कार्यक्रमात गौरवण्यात येऊन त्यांना प्रशस्ती पत्र तथा शासकीय सहकार तथा निमशासकीय प्रमाणपत्र देण्यात येत आहे यावर्षी २०२५ गौरव सोहळा एफसीबीए यांच्या वतीने गोवा राज्यात पणजी येथे थाटात पार पडला

जिल्हा सहकारी सहकारी बँकांच्या वर्गवारी मधून उत्तम संगणकीय सेवा कामकाजासाठी देश पातळीवरील नामांकित संस्था पौटियर को - ऑपरेटिव्ह बॅक्स असोशियसन (एफसीबीए ) यांच्यावतीने ग्राहकांना वेळेत सेवा दिल्याबद्दल जाफराबाद बँकेतील प्रमुख भाग चौकणीस एस एम उबरहंडे, इन्स्पेक्टर माधवराव भोपळे, शाखाधिकारी डी के चव्हाण, रोखपाल करडेल लिपिक एम आर दांडगे या अधिकारी तथा कर्मचाऱ्यांना पारितोषिके देऊन पणजी येथे गौरविण्यात आले .

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड जालना बँकेला लीडरशिप अवार्ड टी हेड ऑफ द इयर व बेस्ट पेमेंट ट्रान्सफॉर्मेशन या बँकिंग संगणकीय सेवा व ग्राहकांना डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल कामकाजासाठी फंट्रीयर को ऑपरेटिव्ह बॅक्स अवॉर्ड या देशातील नामांकित संस्था यांनी देशभरातील ५०० पेक्षा अधिक नागरी व जिल्हा बँकांच्या नामांकन यादी मधून १ हजार कोटी पेक्षा कमी ठेवी असलेल्या जिल्हा सहकारी बँकेच्या वर्गवारी मधून जालना जिल्हा बँकेच्या उल्लेखनीय कामाबद्दल जालना जिल्हा बँकेची सलग आठव्या वर्षीही वरील दोन पारितोषकासाठी तज्ञ जुरी यांचे सकारात्मक शिफारतीनुसार निवड करून या बँकेतील बादशाखेचे अधिकारी तथा कर्मचारीऱ्यांना पणजी येथे पारितोषिके देऊन गौरवण्यात आले आह द आले .

यावेळी गोवा राज्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर, प्रभात चतुर्वेदी जाफराबाद शाखेचे प्रमुख भाग चौकणीस एस . एम . उबरहंडे, इन्स्पेक्टर माधवराव भोपळे, शाखाधिकारी डी के चव्हाण, रोखपाल एस ए . करडेल, लिपिक एम आर दांडगे , राऊत यांच्यासह राज्यातील विविध शाखांचे अधिकारी तथा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जालना येथील पूरग्रस्तांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद



बानेगाव येथे पुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांना दिले मदतीचे आश्वासन

जालना: जिल्ह्याच्या बानेगाव परिसरात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्त नागरिकांशी थेट व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. त्यांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

पुरामुळे मोठे नुकसान झालेल्या बानेगाव परिसरातील नागरिकांशी संपर्क साधण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ही अभिनव पद्धत वापरली. व्हिडिओ कॉलवर त्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली. यावेळी त्यांनी संकटाच्या या काळात शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG









# एसटीतून आरक्षणासाठी : बंजारा समाजाचा महाएल्गार मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला

नांदेड : नांदेड जिल्हा प्रतिनिधी (अनिल धमने ) नांदेड हैदराबाद बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी आज हजारो बंजारा समाजाचा महाएल्गार मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. पारंपारिक वेशभूषा , वाजंत्री यांच्या दाखल झालेल्या हजारो बंजारा बांधवांनी दिलेल्या जय सेवालाल च्या घोषणांनी नांदेड परिसर दणाणून गेला होता. राज्य शासनाने आरक्षण दिले नाही तर हिवाळी अधिवेशनावर आणि मुंबई येथेही विशाल मोर्चा काढू असा इशारा मान्यवरांनी आपल्या मनोगत भाषणात दिला आहे.

जोपर्यंत राज्य सरकार हैदराबाद गॅझेटिअर नुसार एसटी अनुसूचित जमाती प्रवर्गातून बंजारा समाजाला आरक्षण देणार नाही तोपर्यंत बंजारा समाज स्वस्थ बसणार नाही असा इशारा या निमित्ताने पुकारण्यात आला आहे. राज्य सरकारकडे बंजारा समाजाला एसटी तून आरक्षण देण्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे आहेत. हैदराबाद गॅजेटियर आहे यामध्ये बंजारा समाजाचा आदिवासी म्हणून उल्लेख आहे . १० जानेवारी १९५० सी पी आणि बेरार सरकारने बंजारा ना एसटीमध्ये समाविष्ट केले आहे . १८७१ ते १९३१ च्या जनगणनेत बंजारा समाज स्वतंत्र आदिवासी समाज म्हणून नोंदवला गेला आहे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर , जयपाल सिंग यांनी संसदेतही ही मागणी मांडलेली होती. याशिवाय वेळोवेळी जे आयोग स्थापन करण्यात आले त्या आयोगाने ही बंजारा समाजाला एसटी दर्जाच्या मान्यतेस पात्र असल्याचे नोंदवले आहे . यामध्ये लोकूर आयोग १९६५ , मंडल आयोग १९८० , न्यायमूर्ती बापट आयोग २००४ , इथात आयोग २०१४ , भाटीया आयोग २०१४ अशा विविध आयोगाने बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी पात्र ठरवले आहे परंतु जाणीवपूर्वक या समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण दिले जात नाही. त्यामुळे एसटीमध्ये आदिवासींना सात टक्के आरक्षण आहे या आरक्षणाला धक्का न लावता बंजारा समाजाला स्वतंत्र ३ टक्के आरक्षण देण्यात यावे यानुसार आदिवासींना अ मध्ये तर बंजारा समाजाला ब वर्गवारीमध्ये आरक्षण द्यावे अशी मागणी यावेळी मोर्चेकरांनी केली. नवा मोंढा मैदानावर हजारोंच्या संख्येने जमलेल्या बंजारा समुदायांशी खा. डॉ. बि.डी चव्हाण , आ. डॉ.तुषार राठोड , रोहिदास जाधव , एडवोकेट रामराव नाईक , प्रकाश राठोड आदी मान्यवरांनी आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलकांमध्ये क्रांतीचे स्फुलिंग चेतविले. भल्या सकाळी प्रभू रामचंद्राचे नाव घेऊन कामाला सुरुवात करणारी बंजारा समाज ही एकमेव जमात आहे त्यामुळे ज्या हिंदुत्ववादी विचारसरणीने सत्तेत विराजमान असलेल्या भारतीय जनता पार्टीने प्रभू रामचंद्रांच्या खऱ्या अनुयायांना न्याय देण्यासाठी एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे अशी मागणी बि.डी चव्हाण यांनी आपल्या मनोगत आतून लावून धरली. हैदराबाद नुसार बंजारा समाज हा एसटी प्रवर्गात मोडतो याची जाणीवही बि.डी चव्हाण यांनी राज्य सरकारला करून दिली. राज्य सरकार जर आमची मागणी मान्य करत नसेल तर येत्या हिवाळी नागपूरच्या अधिवेशनावरही बंजारा समाजाचा विशाल मोर्चा काढला जाईल शिवाय मुंबईत एक कोटी बंजारा बांधव एकत्रित येऊन आपला मोर्चा करतील असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. दरम्यान यावेळी बोलताना आ .डॉ तुषार राठोड यांनीही राज्य सरकारने बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्यावे. यासाठी बंजारा समाजाने आपली आरक्षणाची मागणी लावून धरत सातत्याने मोर्चे निदर्शने आंदोलने करत राहावीत. निश्चितपणे सरकार आपल्याला आरक्षण देईल असा विश्वास व्यक्त केला. अन्य मान्यवरांनी ही आरक्षणाच्या मागणीसाठी आपली मत व्यक्त केली.

नवा मोंढा मैदानावरून निघालेल्या या विशाल मोर्चामध्ये पारंपारिक वेशभूषा धारण केल्याने हजारो महिला सहभागी झाल्या होत्या. माहूर किनवट पासून ते आंध्र प्रदेश ,कर्नाटका ,तेलंगणा , विदर्भ या भागातूनही मोर्चेकरी या मोर्चात सहभागी झाले होते. एक लाखाच्या पुढेही गर्दी या मोर्चा दिसून आली . मोर्चेकऱ्यांनी अत्यंत शिस्तीत परंतु जय सेवालाल च्या घोषणा देत आरक्षणाची मागणी केली. या मोर्चाने अख्खे शहर दणाणून सोडले.

या मोर्चाचे डॉक्टर बी डी चव्हाण , आ. तुषार राठोड, रोहिदास जाधव, एडवोकेट रामराव नाईक , प्रकाश राठोड यांच्यासह पंजाब चव्हाण , आमदार राजेश राठोड जालना ,आमदार रामलू नाईक हैदराबाद , राजू नाईक ,आकाश जाधव, देविदास भाऊ राठोड , शिव नाईक , खासदार प्राध्यापक अजमेरा सिताराम नाईक, माजी खासदार हरिभाऊ राठोड , डॉक्टर टी.सी राठोड , प्राध्यापक संदेश चव्हाण , अमरसिंग तलवार , दीक्षा गुरु श्री प्रेमसिंग महाराज , आमदार बाबू सिंग महाराज धर्मगुरू पोहरादेवी आदी मान्यवरांनी नेतृत्व केले. मोर्चाच्या सभेचे सूत्रसंचालन बाबुराव जाधव यांनी केले तर आभार बंटी राठोड यांनी मांडले.

## एसडीआरएफच्या सहाय्याने राहेगावात विद्युत, आरोग्य सुविधा उपलब्ध

### महसूल विभागाची मदत , ग्रामस्थ समाधानी

नांदेड /प्रतिनिधी

नांदेड तालुक्यातील राहेगाव येथील पुलावर पाणी आल्यामुळे राहेगावचा संपर्क तुटला होता. एसडीआरएफच्या मदतीने दिनांक २८ सप्टेंबर रोजी गावात विद्युत व वैद्यकीय उपचाराची व्यवस्था महसूल विभागाने तातडीने उपलब्ध करून दिली. आमदार आनंदराव बोंढारकर, नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ , तहसीलदार संजय वारकड यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मदत कार्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



राहेगावच्या पुलावर पाणी आल्यामुळे एक दोन दिवस वगळता मागील दहा दिवसापासून संपर्क तुटला आहे. तसेच मागील तीन दिवसापासून गावात विद्युत व्यवस्था खोळंबली होती. तसेच गावातील लोकांना वैद्यकीय उपचाराचीही बाब विचारात घेऊन तहसीलदार संजय वारकड यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले , उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य आपत्ती प्रतिसाद दल (धुळे) यांचे पोलीस निरीक्षक प्रशांत राठोड व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण मुंडे यांच्याशी संपर्क साधून तात्काळ आवश्यक सूचना दिल्या.

त्यानुसार एसडीआरएफच्या पथकाच्या साह्याने बोटीने विद्युत विभाग, वैद्यकीय पथक राहेगाव येथे पोहोचले. विद्युत विभागाच्या कर्मचारी यांनी गावात तीन दिवसापासून बंद असलेल्या विद्युत पुरवठा सुरू केला. तसेच वैद्यकीय पथकाने १०२ रुग्णाची तपासणी करून औषधोपचार केले. महावितरणचे सहाय्यक अभियंता पी.पी. साखरे, वरिष्ठ तंत्रज्ञ तिरमले, पतंगे यांनी विद्युत पुरवठा सुरळीत केला. वैद्यकीय विभागाचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. विवेक पदमने, डॉ. शेख हसन , आरोग्य सेविका शैख मुमताज, आरोग्य सेवक शैलेश वाघमारे, आरोग्य कर्मचारी बाळू घोडजकर यांनी वैद्यकीय सेवा दिली. सदरील मोहीम यशस्वी करण्यासाठी वाजेगाव व तुप्पा महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी प्रमोद बडवणे, ग्राम महसूल अधिकारी गौतम पांढरे, राहेगावचे सरपंच विलास पाटील इंगळे, पोलीस पाटील प्रतिनिधी संजय पाटील इंगळे, किकीचे पोलीस पाटील गोविंद तेलंगे, आशाताई सुमित्रा इंगळे यांनी योगदान दिले.

## महापालिकेने मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.जनार्दन पक्कान्ने यांना दिला निरोप

नांदेड,:- महानगरपालिकेत महाराष्ट्र शासनाचे वित्त व लेखा विभागाचे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.जनार्दन पक्कान्ने यांची नुकतीच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे मुख्य लेखाधिकारी या पदावर पदस्थापना झालेली असल्याने महापालिकेत दिनांक २९ सप्टेंबर रोजी सोमवारी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करुन त्यांना निरोप देण्यात आला.

### नांदेड नवे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री धनराज पांडे महापालिकेत रूजू



संबंधीत अधिकारी हे दिनांक ०२. सप्टेंबर रोजी सोमवारी मुख्य लेखा अधिकारी म्हणुन प्रतिनियुक्तीवर या महापालिकेत रुजु झाले होते. त्यांचा मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावरील एकुण ३ वर्षांचा कार्यकाळ राहीलेला असुन त्यांनी महापालिकेच्या आर्थिक बाबीचा ताळमेळ ठेवण्याचे कार्य उत्तमरित्या पार पाडलेले आहे. लेखा विभागासोबतच त्यांच्याकडे संगणक विभागाच्या विभाग प्रमुख पदाचा व काही कालावधीपासून मुख्य लेखापरीक्षक या पदाचा सुद्धा पदभार सुद्धा त्यांच्याकडे होता. या सर्व पदांची जबाबदारी डॉ.जनार्दन पक्कान्ने यांनी चोखरित्या पार पाडली. यावेळी आयुक्त व अतिरिक्त आयुक्तांनी मनागेत व्यक्त करतांना त्यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या सेवेचा या महानगरपालिकेस लाभ झाला असुन लेखा व संगणक विभागाच्या कामकाजामध्ये बऱ्याचशा सुधारणा त्यांनी घडवून आणल्याचे यावेळी मत व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी नव्याने रुजू झालेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री धनराज पांडे यांचे सुद्धा आयुक्तांचे हस्ते स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु, नितीन गाढवे, निलेश सुंकेवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ.जनार्दन पक्कान्ने, नुतुन लेखा अधिकारी धनराज पांडे, शहर अभियंता श्री सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादेक, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ.मिर्झा फरहतुल्ला बेग, उपअभियंता प्रकाश कांबळे, क्षत्रिय अधिकारी रावण सोनसळे, राजेश जाधव व इतर विभाग प्रमुखांची व लेखा विभागातील कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन लेखा विभागाचे गजानन रासे तर मनोगत व आभार प्रदर्शन जनसंपर्क विभागाचे सुमेध बनसोडे यांनी केले.







### ओला दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी

## संभाजी ब्रिगेडचे अशोक चव्हाण यांच्या घरासमोर बोंबमारो आंदोलन..!

**नांदेड नांदेड ओला दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे या मागणीसाठी सरकारमधील भाजपचे वरिष्ठ नेते खा अशोकराव चव्हाण यांच्या घरासमोर बोंबमारो आंदोलन करायला जाणार्या संभाजी ब्रिगेड कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**

संभाजी ब्रिगेड च्या वतीने राज्यभरात सत्तेत असलेल्या जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांच्या घरासमोर आंदोलन करून झोपीचे सोंग घेतलेल्या नेत्यांना जागे करण्यासाठी सांगितले असता नांदेड येथे संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष कमलेश कदम यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते खा.अशोक चव्हाण यांच्या घराकडे जात असताना पोलिसांनी ताब्यात घेतले व शिवाजी नगर पोलिस स्टेशन येथे घेऊन गेले यावेळी ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे, हेक्टरी एक लाख रुपये अनुदान मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात या घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता.यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, प्रदीप गुब्रे,इंजि प्रवीण जाधव, रूपेश पाटील,अंकुश कोल्हे, अविनाश शिंदे, मोहन शिंदे,नितीन कोकाटे, दिलीप दळवी,किरण बाबर, प्रभाकर राऊत,गणपत बोडके, संभाजी शेवाळे,राम कदम,कनिष्क खिलारे, विशाल कदम, साईनाथ शिंदे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती

ओला दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे

## सिडकोत जागतिक हृदयरोग दिन साजरा




नांदेड /प्रतिनिधी

जागतिक हृदयरोग दिन जगभरात दिनांक २९ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने हडको येथील कलंत्री रुग्णालयात सकाळी १० वाजता जनजागृती फेरी, तज्ञ डॉक्टरांचे हृदयरोग दिन विषयक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. भिवराज कलंत्री नरसिंग इन्स्टिटच्यूट हडको,जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको, इंडियन रेडक्रॉस सोसायटी नांदेड व ग्लेनमार्क फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी १० वाजता कलंत्री रुग्णालय हडको येथून हृदयरोग जनजागृती फेरी काढण्यात आली. या जनजागृती फेरीस महापालिका उपायुक्त मिर्झा बेग ,माजी महापौर तथा इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे कार्याध्यक्ष अजय सिंह बिसेन, सामाजिक कार्यकर्ते हर्षद शहा ,डॉ. भास्कर जन्नावार, डॉ. प्रमोद पाटील, संयोजक डॉ. अशोक कलंत्री ,डॉ. सुरेखा कलंत्री, प्रा. विश्वास हंगरगेकर, नागेश दर्गू यांनी हिरवी झेंडी दाखवली. मान्यवरांच्या हस्ते सत्कार यावेळी डॉ. अशोक कलंत्री व कलंत्री रुग्णालयाच्या वतीने करण्यात आला .या जनजागृती फेरीचा समारोप सिडको येथील साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाच्या ठिकाणी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा .संभाजी सूर्यवंशी ,प्रा .दिलीप काठोडे, दलितमित्र नारायण कोलंबीकर, एस. पी. कुंभारे, बळवंत तुपेकर यांनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक कलंत्री संचलन दिगंबर शिंदे तर डॉ. अपूर्वा कलंत्री यांनी आभार मानले.